म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ५५५
१९३०

REFBK-0004116

म. ग्रं. सं. ठाणे
पद
नं.

पो. तासगांव, जि. सातारा

वेंच खरें राष्ट्रहित !

# मुलांचे न्यायमूर्ति !



पुष्प १ लें. वर्ष १ लें.

— लेखक —
एस्. एम्. सिन्नरकर,
बी. ए. एल्एल्. बी. वकील, तासगांव.

किंमत ४ आणे.

ॐ

बालहितचिंतनमाला–पुष्प १ लें.

# मुलांचे न्यायमूर्ति !



— लेखक —

एस्. एम्. सिन्नरकर, बी. ए. एल्एल्. बी. वकील,
मो. [illegible] जि. [illegible].

REFBK-0004116

प्रथमावृत्ति (प्रती २ हजार

सन १९३०

[ सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन. ]

## उपसंपादकमंडळ.

श्री. रा. रा. खंडनाक राजनाक इनामदार, कळंबी.
,, ,, दादा जिनाप्पा मधवाण्णा, हेडमास्तर भिलवडी.
,, ,, रामचंद्र विनायक कुलकर्णी, ऊर्फ आनंदघनराम सुप्रसिद्ध ग्रंथकर्ते, तासगांव.
,, ,, विष्णु नारायण सुतार, हेडमास्तर सोळशी.
,, ,, कृष्णा नायकू सुतार, हेडमास्तर धामणी; व बालसाधु तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वराचे कर्ते.
,, ,, भाऊ वामन डवरी, तासगांव.
,, ,, सुलेमान मोहियुद्दीन शेख हे. मा. तासगांव उर्दू.
,, ,, रामचंद्र दत्तात्रय गुरव, तासगांव.

मुद्रक—बा. भा. जोशी, ज्ञानविलास प्रेस, बुधवार पुणें सिटी.
प्रकाशक—श्रीपाद महादेव सिन्नरकर, वकील, मु. तासगांव.

ॐ

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।


बालसेवा, राष्ट्रसेवा
करण्याची संधि आज मिळाली,
त्यापूर्वीच, या संधीचा फायदा घेण्याकरितां,
या जगतीतलावर आणून सोडणाऱ्या, इतकेंच नव्हे
तर स्वतः अक्षरशत्रु असूनही मजला कार्यक्षम करून
सोडणाऱ्या माझ्या दैवततुल्य स्वर्गस्थ

मातुश्री पार्वतीमाता

यांचे वंद्य चरणकमलावर ही पहिली कृति
तिच्या कृपाप्रसादाची आठवण म्हणून
अत्यंत विनयानें व पूज्यभावानें
अर्पण केली आहे.

बालक

श्रीपाद



# आरंभ.

ऐसें भाग्य कधीं लाहाता होईन। अवघे देखें जन ब्रह्मरूप ॥
मग तया सुखा अंत नाहीं पार। आनंदें सागर हेलावती ॥
शांति क्षमा दया मूर्तिमंत आंगीं। परावृत्त संगीं कामादिकां ॥
तुका म्हणे माझी पुरवी वासना। कोण नारायणा तुजाविणें ॥

भगवद्भक्त साधु तुकाराममहाराज.

प्रिय बाळांनो, आपण सर्व परमेश्वराच्या मूर्ति आहोंत; आनंदाच्या मूर्ति आहोंत. आणि याच प्रकारची सदैव मनामध्यें जाणीव ठेवून आपण वागलें पाहिजे व त्याकरितां परमेश्वरानें आपणांस सद्‌बुद्धि द्यावी अशी आपल्या अंतःकरणाची तळमळ महान् भगवद्भक्त तुकाराममहाराज यांनीं येथें व्यक्त केली आहे. त्याचें कारण असें आहे कीं, थोरपणीं जगाच्या नानाविध प्रसंगांनीं कोणाही व्यक्तीची वर दिलेली भावना मलिन होत जाते. फक्त बाळांनो, तुमच्या ठिकाणीं मात्र परमेश्वराचें निर्मल रूप, दैवी आनंद पहावयास मिळत असतो. अशा प्रकारच्या परमेश्वराच्या व आनंदाच्या मूर्तींचा नेहमीं मंगलकारक सहवास घड असें कोणाला वाटणार नाहीं !

बालवाचकांनो, प्रस्तुत ले ही, तुमच्या गोड संगतीचा लाभ मिळावा, तुमच्या बोबड्या भावनां विचारांचा निर्मळ देखावा पहावा, अशी फार इच्छा होती. ईश्वरानें कृपा केली, योग आला; तो दुहेरी आला ! तुमच्यासारख्या बालबालिकांभोंवतीं ज्ञानरूपी पुष्पांची आरास करून त्यांच्या सुगंधानें तुमचीं मनें आनंदित करावीं, म्हणून अशीं पुष्पें तयार करून

तुमच्या हातीं देणारी "बालहितचिंतनमाला" या नांवाची पुस्तकमाला सुरू करण्याचा मंगल प्रसंग अगदीं अनपेक्षित रीतीनें घडून आला! व त्यांतील पहिलें पुष्पही तयार करावें लागल्यामुळें तुमचेपुढें प्रत्यक्ष येण्याचाही योग त्वरित जमून आला. आणि त्यायोगें तुमची सत्संगति लाभून तुमचा-आमचा स्नेह दृढतर होत जाईल अशी उमेद वाटूं लागली आहे. ईश्वर तिला मूर्त रूप देवो अशी त्याजवळ प्रार्थना आहे.

मालेचें हें प्रथम पुष्प तुमचे हातीं देण्यास फार आनंद होत आहे. तें थोड्या घाईनें, केवळ मुलांना उपयुक्त भाग घेऊन, तयार केलें आहे. तरी वाचकांनीं त्याच्या बाह्य रचनेकडे न पाहतां त्यांतील चरित्राच्या थोरवीकडेच पहावें व गोड मानून घ्यावें अशी विनंति आहे.

माला काढण्याच्या कल्पनेपासून मालेचें प्रथम पुष्प तयार होईपर्यंत माझे सन्मित्र श्री. रा.रा. गुरव व शेख मास्तर यांची मला जी मदत झाली आहे, त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच होणार आहेत!

"मुलांचे न्यायमूर्ति" तयार करितांना श्री. रा. रा. नरहर रघुनाथ फाटक यांनीं लिहिलेलें न्यायमूर्तींचें मोठें चरित्र व श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनीं प्रसिद्ध केलेलीं 'न्यायमूर्तींचीं धर्मपर व्याख्यानें' या पुस्तकांतलि न्यायमूर्तींचें सारांशभूत चरित्र यांचा फार उपयोग झाला व हा उपयोग वरील लेखकांच्या व प्रकाशकांच्या सहानुभूतीवर अवलंबून, त्यांच्या परवानगी-शिवायच केला, याबद्दल ते उदार अंतःकरणानें माफी करतील अशी फार आशा आहे.

छपाईच्या सजावटीबाबतही "ज्ञानविलास" छापखान्याचे मालक श्री. रा. रा. बाळकृष्ण भाऊ जोशी, यांनीं अल्प परिचयामध्यें आपले-पणानें थोड्या अवधीमध्यें छपाईचें काम चांगलें तयार करून दिलें, या-बद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

लेखक व मालेचा मुख्य संपादक या दुहेरी नात्यानें हें पुस्तक प्रकाशित करण्याचा योग आला आहे. पुस्तक मालेमार्फत 'प्रथम पुष्प' म्हणून प्रसिद्ध होत आहे. त्या कामीं मालेच्या उपसंपादकांनीं ठरल्याप्रमाणें साहाय्य देऊन मालेचें कार्य यशस्वी रीतीनें सुरू करून दिलें, याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें.

शेवटीं ही लेखमाला तुमची आहे, तुमच्या सर्वांकरितां आहे, तिचा गौरव तो तुमचाच गौरव, तिचा मोठेपणा तो तुमचाच मोठेपणा. याचकरितां तुम्ही सर्व बालबंधु, बालभगिनी, सर्व आबालवृद्धांनीं तिच्या उत्कर्षाकारितां प्रेमानें, आनंदानें पुढें यावें आणि सक्रिय सहानुभूतीनें मालेचें व अप्रत्यक्ष आपलेंही हित साधावें अशी सर्वांना नम्र परंतु आग्रहाची प्रार्थना आहे.

कर्ताकरविता परमेश्वर आहे. त्याच्याच कृपाप्रसादानें मालेला व मालेच्या प्रथम पुष्पाला आजचें मूर्तरूप आलें आहे; आणि यापुढेंही मालेच्या पुढील कार्यास त्याच दैवी शक्तीची कृपा व आशीर्वाद पाहिजे आहे. तो सदैव लाभावा आणि मालेचें एकंदर कार्य व परमेश्वरी कृपा यायोगें महान साधु भगवद्भक्त ज्ञानेश्वरमहाराज यांच्या भाषेंत सांगावयाचें झालें तर—

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ॥
जो जें इच्छी तो तें लाहो । प्राणिजात ॥

अशी परमेश्वरचरणीं प्रार्थना करून तूर्त आपली रजा घेत आहें.

मालेचें आफीस,
तासगांव, जि. सातारा.
विजयादशमी, आश्विन
शके १८५२.

आपणां सर्वांचा हितचिंतक,
एस्. एम्. सिन्नरकर,
बी. ए. एल्एल्. बी. वकील.

# अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| प्र. | १ | न्यायमूर्तींचा जन्म ... ... ... | १ |
| प्र. | २ | हरवलेले माधवराव ! ... ... ... | ३ |
| प्र. | ३ | बालपण ... ... ... ... | ७ |
| प्र. | ४ | बालपणचे प्रसंग व त्यांचा अर्थ ... ... | ९ |
| प्र. | ५ | बालपणचे आणखी कांहीं प्रसंग ... ... | १३ |
| प्र. | ६ | पितापुत्र ... ... ... ... | १८ |
| प्र. | ७ | विद्यादेवीचा निःसीम भक्त ! ... ... ... | २० |
| प्र. | ८ | विद्यार्थिदशा ... ... ... ... | २१ |
| प्र. | ९ | शिक्षणाची जागा आणि शिक्षक ... ... | २६ |
| प्र. | १० | माधवरावांची शिकविण्याची पद्धति ... ... | ३१ |
| प्र. | ११ | नोकरीचे प्रकार ... ... ... ... | ३४ |
| प्र. | १२ | न्यायमूर्तींच्या आसनावर ! ... ... ... | ३६ |
| प्र. | १३ | लोकहिताची कामगिरी ... ... ... | ३८ |
| प्र. | १४ | माधवरावांचें धर्माचरण ... ... ... | ४१ |
| प्र. | १५ | सामाजिक कार्य ... ... ... ... | ४७ |
| प्र. | १६ | माधवराव व देशांतील उद्योगधंदे ... ... | ५१ |
| प्र. | १७ | राजकीय सुधारणेचें धोरण ... ... ... | ५७ |
| प्र. | १८ | माधवरावांचा उजवा हात ! ... ... ... | ५८ |
| प्र. | १९ | माधवरावांचें दुखणें व शेवट ... ... ... | ६० |
| प्र. | २० | माधवरावांचा स्वभाव व त्यापासून बोध ... ... | ६१ |
| प्र. | २१ | उपसंहार ... ... ... ... | ७० |

# मुलांचे न्यायमूर्ति

## प्रकरण १ लें

### न्यायमूर्तींचा जन्म.

" पुष्पाच्या संसर्गे सूत्रालाही घडे शिरीं वास."

बालबंधूंनो, थोर पुरुषांच्या येण्यानें, राहण्यानें व संगतीनें एकाद्या घोर अरण्याचें ठिकाण सुद्धां नंदनवनासारखें बनूं शकतें ! ज्या ठिकाणाचें नांव भूगोल शिकवितांना सुद्धां वर्षांचीं वर्षें बाजूला पडून राहिलेलें असतें, ज्याला थोडेंसुद्धां महत्त्व असत नाहीं, त्याच ठिकाणाला एकाद्या थोर विभूतीच्या जन्मामुळें एकाएकीं कसें आणि किती महत्त्व येतें, याचा अनुभव सर्वांना आहेच.

कुठें रत्नागिरी जिल्हा व कुठें त्याच्या कोनाकोपऱ्यांत दडलेलें तें मोभार–पाचेरी खेडें ! परंतु प्रस्तुत चरित्राचे नायक **न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे** यांनीं ज्या आपल्या जन्मभूमीचा, कुलाचा, वाडवडिलांचा उद्धार केला, तें कुल, ते वाडवडिल मूळचे राहणारे मोभार-पाचेरीचे होते.

त्या ठिकाणीं त्यांना खोतीचें उत्पन्न होतें. माधवरावांच्या निपणज्यांचें नांव **भगवंतराव**. ते प्रथम कोंकणांतून देशावर पंढरपुराजवळ करकंब येथें राहण्यास आले. यांचें घराणें गृहस्थाचें. भगवंतरावांना ज्योतिष सांगण्याचें ज्ञान चांगलें होतें. त्यांनीं एकदां इतिहासप्रसिद्ध नाना फड-

णवीस यांचें भविष्य बिनचूक सांगितलें होतें, असें म्हणतात.

भगवंतरावांच्या बायकोचें नांव **कृष्णाबाई**. त्यांना पुष्कळ मुलें झालीं, पण जगत नव्हतीं. म्हणून त्यांनीं सतत १२ वर्षें देवावर निष्ठा ठेवून मोठ्या कष्टानें खडतर तपश्चर्या केली. पिंपळाला व गाईला प्रदक्षिणा घातल्या. कोणीही अतिथि घरीं आल्यास त्या सर्व कामें बाजूला ठेवून त्याला भोजन घालून संतुष्ट करीत असत. कृष्णाबाई पिंपळास प्रार्थना करीत कीं, " देवा, मला दैवशाली पुत्र होऊं दे; त्याचा विस्तार तुझ्यासारखा होऊं दे. तुझ्या छायेमध्यें जसे असंख्य लोक विसावा घेऊन आनंदित होतात, तसेच माझ्या पुत्राच्या सहवासानें व त्याच्या नंतरच्या संततीच्या सहवासानें सर्व लहानथोर आनंदित होवोत. " कृष्णाबाईची तपश्चर्या देवाचे घरीं रुजू झाली. त्यांचे पोटीं **भास्करराव ऊर्फ आप्पाजी** हे जन्मले. ते व त्यांचे मुलगे व नातू हे सर्व बुद्धिमान, शूर, पराक्रमी, उद्योगी, उंच, बांध्यानें मजबूद, तसेच मनानेंही उदार व थोर असेच निघाले.

भास्करराव ऊर्फ आप्पाजी हे सांगली संस्थानचे अधिपति **श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन** यांचे तैनातींत होते. ते प्रथम कारकून होते. नंतर सैन्यांत दाखल होऊन लढवय्ये बनले. पुढें आपल्या प्रामाणिकपणानें, बुद्धिमत्तेनें, व निर्भीड सल्लागार म्हणून श्रीमंतांचे इंग्रजांकडे वकील झाले; व श्रीमंतांकडून वंशपरंपरेनें तैनात मिळविली. ते आपल्या वयाच्या पंचाण्णवाव्या वर्षापर्यंत शरीराचें शक्तिसामर्थ्य उत्तम प्रकारें टिकवून जगले. ते आपला सर्व वेळ ईश्वराचे चिंतनांत घालवीत व मुखानें नामस्मरण करीत असत.

आप्पांचे थोरले चिरंजीव **अमृतराव तात्या** हे चरित्रनायक माधवराव यांचे आजोबा होत. हे करकंबाहून नगर जिल्ह्यांत व तेथून पुणें जिल्ह्यांत

मामलेदारीचे कामावर होते. हेही आपल्या वडिलांप्रमाणें बांध्यानें उंच शरीरानें बळकट, व घोड्यावर बसणारे पटाईत होते. त्यांना संस्कृत भाषेची व शास्त्रांची फार आवड होती. अमृतराव तात्यांना चार मुलगे: बळवंतराव दादा, गोविंदराव भाऊ, गोपाळराव व विष्णुपंत. पैकीं **गोविंदराव** हे माधवरावांचे वडील. हे नाशिक जिल्ह्यांत निफाड या गांवीं नोकरीवर होते. याच पुण्यभूमीचे ठिकाणीं माघ शुद्ध षष्ठी शके १७६३ म्हणजे तारीख १८ जानेवारी सन १८४२ इसवी रोजीं मंगळवारीं सूर्यास्ताचे वेळीं, आपले चरित्रनायक न्यायमूर्ति **महादेव गोविंद रानडे** यांचा जन्म झाला.

---

## प्रकरण २ रें,

### हरवलेलें माधवराव !

मुलांनो, जगांतील कोणत्याही थोर माणसावर परमेश्वराची थोर कृपा असते. परमेश्वराच्या कृपेशिवाय थोरपणा मिळत नसतो. तुम्ही ज्याचें चरित्र आतां वाचणार, तो माधव बाळ अगदीं लहान म्हणजे फक्त अडीच वर्षांच्या वयाचा होता. माधवरावांचे आजोबा **अमृतराव** तात्या आंबेगांवास मामलेदार होते. आजी अद्याप निफाडासच होत्या. माधवराव व त्यांची आई **गोपिकाबाई** असे दोघे आजीजवळ निफाडासच होते. माधवराव अडीच वर्षांचे असतांना त्यांच्या आईला **दुर्गा** नांवाची मुलगी झाली व माधरावांना चिमुकली बहीण खेळावयास मिळाली !

माधवरावांचे वडील **गोविंदराव** कोल्हापुरास होते. बरेच दिवस झाले, म्हणून माधवरावांची आई, माधवराव व नुकतीच झालेली दुर्गा

यांना घेऊन कोल्हापुरास निघाली. वाटेवर आंबेगांवास सासरे अमृतराव यांना भेटून पुढें जावयाचें होतें. बरोबर सोबत म्हणून एक शिपाई व माधवरावांचे चुलत चुलते विठूकाका असे होते. शिपाई गाडीवरोबर होता, विठूकाका मागून घोड्यावरून येत होते.

ते दिवस उन्हाळ्याचे होते. दिवसा उन्हाचा त्रास होणार, म्हणून रात्रीं प्रवास करणेंच सुखाचें होतें. हल्लींप्रमाणें त्या वेळीं मोटारी, टांगे वगैरे जलद जाणारीं वाहनें नव्हतीं. सर्व मंडळी बैलगाडींतूनच निघाली होती. ते दिवस काळोख्या रात्रीचे होते; त्यामुळें रात्रीं चांदण्याच्या प्रकाशानें वाट दिसण्यासारखी नव्हती. प्रवास सुरू झाला. पहिल्या प्रथम रात्र होती, तरी अकरा बारा वाजेपर्यंत मंडळी जागी होती; पण पुढें वेळ रात्रीची असल्यामुळें व प्रवासाची दगदग झाल्यानें माधवरावांची आई व दोन मुलें गाढ झोंपी गेली. तान्ही मुलगी दुर्गा आईच्या कुशींत निजली होती, व माधवरावांना वेगळ्या पांघरुणांत गुरफटून बाजूला निजविलें होतें. ती वेळ शांत होती. वारा गार वहात होता. बाकीच्या मंडळीवरही झोंपेचा अमल चढूं लागला. शिपाईबोवा पेंगूं लागले ! गाडीवान पेंगूं लागला ! बैल पेंगूं लागले ! गाडी पेंगूं लागली ! विठूकाका मागें राहिले होते. मुलांनो, अशा वेळेला अचानक संकट येणें किती भयंकर आहे याची कल्पना करा !

वर लिहिल्याप्रमाणें झोंपेच्या साम्राज्यांत सर्व शांतच शांत होतें. गाडीवाल्याचें बैलांकडे लक्ष नाहीं, शिपायाचें वाटेकडे लक्ष नाहीं ! बैलांच्या प्रामाणिकपणामुळें गाडी वाटेवरील चाकोरमिधून कशीबशी चालली होती. इतक्यांत एक खोल उतरणीची जागा आली. त्यांतून बैल झपाट्यानें गाडी घेऊन गेले. छोटे माधवराव झोंपेमध्यें लोळतलोळत पांघरुणासकट गाडीच्या कडेला आले होते.. ते उतारावरून

जाणाऱ्या गाडीच्या जोराच्या धक्क्यानें हळूच रस्त्यावर कलंडून पडले! माधवरावांची आई तान्हुल्या दुर्गाताईला कुशींत घेऊन आराम झोंप घेत होती. ती जागी असती, तर तिनें आपल्या मुलाकरितां आकाश-पाताळ एक करून टाकलें असतें! पण बिचारी गोपिकाबाई झोंपेमुळें अगदीं शांत पडली होती. गाडीवान घसारीला जागा झाला, पण त्यालाही उमज पडला नाहीं. गाडी खुशाल मैल दीडमैल पुढें चालत आली होती!

बाळांनो, माधवराव पडण्याच्या धक्क्यानें खास जागे झाले असले पाहिजेत. त्या मानानें वय अडीच वर्षांचें म्हणजे कमी नव्हतें. त्यांनीं घाबरून आरडाओरड केली असती, तर रानावनामध्यें रानटी जनावरें धावून आलीं असतीं! साप, विंचूकाट्याचें भय होतेंच! आपण गाडींतून पडलों एवढी गोष्ट समजण्याइतका जाणतेपणा माधवरावांस आलेला होता. मग त्यांना शांत राहून विठूकाका येईपर्यंत स्वस्थ पडून राहण्याची बुद्धि कोणीं बरें दिली? त्या काळोख्या रात्रीं आड-रानामध्यें जवळ चिटपाखरूं नसतांनाही त्यांस कसलीही इजा न होऊं देतां, सुरक्षित कोणीं राखिलें असेल बरें! मुलांनो, अशा प्रसंगानेंच परमेश्वराची आठवण होते. जगाचा पोषक, संरक्षक व चालक, परमेश्वर म्हणून कोणी तरी आहे, असें या वेळेला मनाला पटूं लागतें. असो.

वरीलप्रमाणें सडकेवर अडीच वर्षांचे माधवराव अर्धा पाऊण तास पडले होते. मागाहून विठूकाका घोड्यावरून येत होते. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकून, माधवरावांनीं "विठूकाका" अशी हाक मारली, व बोबड्या भाषेनें "मी इथें पल्लों आहें!" असें सांगितलें. विठूकाकांनीं माधवरावांचा आवाज ओळखला, व चटकन् उडी

मारून माधवरावांना उचलन पोटाशीं घट्ट आवळून धरिलें, व अंतः-करण गहिंवरून येऊन त्यांनीं परमेश्वराचे मनापासून आभार मानले ! आणि पुन्हां घोड्यावर बसून दौडत गोपिकाबाई—माधवरावांची आई—यांच्या गाडीस येऊन त्यांनीं गांठलें !

गाडीजवळ येतांच विठूकाकांनीं विचारलें—" गोपिकावहिनी, जाग्या आहांत ना ? मुलांना पांघरूण नीट आहेना ? " गोपिकाबाईनीं न पाहतांच अर्धवट झोंपेंत " हो, सर्व ठीक आहे. " असें कळविलें. विठूकाकांनीं पुन्हां खोदून विचारलें, " तुम्ही अजून झोंपेंतच आहांत. दोन्ही मुलें तुमच्याजवळ आहेत का, नीट पहा ! "

आतां मात्र गोपिकाबाई चपापल्या व खडबडून जाग्या झाल्या, व सर्व गाडीभर शोधून पाहिलें. माधवराव कुठें सांपडेनात ! त्या वेळीं त्या माउलीच्या मनाची काय स्थिति झाली असेल बरें ! पुत्रवात्सल्यानें अंतःकरण भरून आलें व डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या ! दुःखामुळें मुखावाटे शब्द उमटेना. यापेक्षांही भयंकर करुणस्थिति झाली असती, पण विठूकाकांनीं बिचारीचा फार वेळ अंत पाहिला नाहीं. चटकन् त्यांनीं माधवरावाला गोपिकाबाईच्या स्वाधीन केलें व म्हणाले—" आज परमेश्वरानें केवढी खैर केली बरें ! "

त्या वेळच्या गोपिकाबाईच्या आनंदाचें वर्णन कोण करूं शकेल ! पुत्रप्रेमाचा जवळजवळ नाहींसा झालेला ठेवा पुन्हां परत मिळाल्यावर त्याला " परमेश्वराचीच खरी कृपा ! " याशिवाय दुसरें काय नांव देतां येईल ! गोपिकाबाईनीं आपल्या मनामध्यें परमेश्वररूपी विठू-काकांचे व त्याहीपेक्षां सर्वसाक्षी परमेश्वराचे शतशः—नव्हे सहस्रशः आभार मानिले असतील ! त्या दयाघन परमेश्वराला नमस्कार केले असतील. त्या वेळीं गोपिकाबाईना " माधवराव हें परमेश्वरी कृपेचें

लेकरूं -" असें वाटलें असल्यास नवल नाहीं. आणि तेंही खरेंच ! ज्या माधवबाळानें आपल्या या हिंदभूमीचें नशिब आपल्या अलौकिक कर्तबगारीनें व गुणांनीं उदयास आणलें, त्या माधवबाळावरील हें संकट म्हणजे हिंदुस्थानावरचेंच संकट टळलें, असें कोण म्हणणार नाहीं बरें !

---

# प्रकरण ३ रें.

## बालपण.

बालवाचकांनो, तुम्ही स्वातंत्र्याच्या मूर्ति आहांत. तुमचें कोवळें अंतःकरण, निर्मळ मन, सरळ विचार, निष्कपट आचरण आणि आनंदी वृत्ति पाहिली, म्हणजे बालपण हें देवपण आहे असें म्हणतात, तें खरें वाटूं लागतें. पण आम्ही थोर माणसें कित्येक वेळां तुमच्या या बालपणींच्या गुणांचा अर्थ आमच्या मर्जीप्रमाणें करून तुम्हांला कधीं हट्टी, कधीं मैंद, कधीं उनाड, कधीं एकनादी, कधीं एकलकोंडा, अशीं नानाप्रकारचीं नांवें ठेवूं लागतों. पण मला वाटतें, बाळांनो, तुमच्या लहानपणींच्या निरनिराळ्या कृतींचा व लहरींचा अर्थ लावणें ही फार कठीण पण अत्यंत महत्त्वाची कामगिरी आहे. ती कशी हें समजण्याकरितांच थोर थोर लोकांच्या बालपणींचे त्यांच्या वडील माणसांनीं ठरविलेले दुर्गुणच थोरपणीं कसे त्यांचे अलौकिक गुण ठरले, याचीं वर्णनें नेहमीं वाचण्यांत आलीं पाहिजेत.

माधवरावांचें बालपणही वडील माणसांच्या नेहमींच्या कोत्या समजुतीप्रमाणें निराशा उत्पन्न करणारेंच ठरलें होतें. माधवरावांचें बालपण तीन वर्षांपासून तेरावे वर्षापर्यंत कोल्हापुरास गेलें. वयाच्या

सहाव्या सातव्या वर्षी त्यांना मराठी शाळेंत घातलें.

माधवरावांच्या बालपणींच्या स्वभावाचें वर्णन त्यांच्याच वडील माणसांकडून नमूद असलेलें साधारणपणें खालीलप्रमाणें आहे. व कांहीं बालपणींचे गमतीचे प्रसंगही माधवरावांच्या स्वभावाची ओळख करून देण्यासारखे आहेत.

## स्वभाववर्णन नं. १

"आमचा माधव फार थंड व धिमा. याला कांहीं समजत नसे. धड निरोपही सांगतां यावयाचा नाहीं. शाळेंत परीक्षा झाली म्हणजे बाकीचीं मुलें 'आम्ही पास झालों; आम्हांला परीक्षक असें असें म्हणाले,' वगैरे किती तरी सांगतात! पण माधवाला विचारल्यास 'त्यांत काय सांगावयाचें आहे? रोज शाळेंत जाऊन आम्हीं अभ्यास करितों तर पास होणारच, त्यांत काय ज्यास्त आहे!' असें म्हणून मुकाट्यानें जात असे."

बाल माधवरावांचें केवढें हें मनोधैर्य! केवढा हा आत्मविश्वास!

## स्वभाववर्णन नं. २

माधवरावांची आई तर नेहमीं काळजींतच असे व म्हणे कीं, "या माधवाचें कसें होईल! हा दहा रुपये मिळवून आपल्या बायकोचें पोट भरण्याइतका शहाणा होईल काय? हा आपला शुद्ध नंदी; एकनादी व सरळ. डावपेच कांहीं माहीत नाहींत व ते समजावयाचेही नाहींत. एकदां एका गोष्टीला आरंभ केला कीं, ती आपली न चुकतां नेमानें करायचाच! त्याबद्दल पुन्हां सांगावें लागत नसे. पण त्यांत कोणीं अडथळा केला कीं, हट्ट धरून रडत बसावयचा. मग समजूत लौकर व्हावयाची नाहीं."

बाळांनो, वर वर्णन केल्याप्रमाणें कितीतरी लहान मुलांची वागणूक

असते ! या तुमच्या वर्तनामध्यें, या तुमच्या वरवर दिसणाऱ्या दुर्गुणामध्यें मोठेमोठे गुण लपलेले असतात. बालपणींच या तुमच्या ठिकाणच्या उपजत गुणांच्या लहानलहान अंकुरांची जोपासना, योग्य वळण देऊन केल्यास, तुम्हांलाच न्यायमूर्ति रानडे अगर आणखी त्यांच्याचसारख्या दुसऱ्या थोर व्यक्ति बनवितां येणार नाहीं काय ? लहानपणीं तुमच्या प्रत्येक कृतींचें बारकाईनें निरीक्षण करून त्या कृतींमधूनच तुमचें थोरपणींचें चरित्र चांगलें होईल, उदार होईल, असा प्रयत्न मनापासून करितां यावा, म्हणून थोरांचीं बालचरित्रें तुमच्या, तुमच्या पालकांच्या अवलोकनांत नेहमीं यावयास नकोत काय ?

---

## प्रकरण ४ थें

### बालपणींचे प्रसंग व त्यांचा अर्थ.

माधवरावांच्या आयुष्यांतील लहानपणींचे कांहीं गमतीचे प्रसंग त्यांच्या वडील माणसांनीं खालीलप्रमाणें वर्णन केले आहेत.

#### प्रसंग १

"पहिल्यांदां धुळाक्षराच्या शाळेंत घातल्यावर शाळेंतून आला न आला कीं, घरीं सारा दिवस तेंच आपल्याशीं हळू हळू बडबडे, व बोटानें भिंतीवर अक्षरें व उजळणी काढीत राहावयाचा. हाच याचा खेळ व हीच याची करमणूक ! रस्त्यांत उगीच खेळत असला तरी धुळींत उजळणी काढीत बसावयाचा. असा वेडा होता ! "

बाळांनो, वरील प्रसंगाचा अर्थ माधवरावांच्या खऱ्या स्वभावाच्या परीक्षेच्या दृष्टीनें लावितां येतो कां पाहू या:—माधवरावांच्या धुळाक्षरें शिकण्याच्या प्रकारास त्यांच्या पालकांनीं वेडेपणा असें म्हटलें.

खरोखरी माधवराव वेडे होते काय ? वेडे तर खास नव्हतेच. पण उलट त्यांच्या धुळाक्षरें पाठ करण्याच्या पद्धतीवरून खालीं दिलेले गुणच त्यांचे ठिकाणीं अंकुररूपानें दिसून येऊं लागले होते असेंच म्हणावें लागेल.

१ जी गोष्ट शिकावयाची तिच्याबद्दल अत्यंत आवड वाटणें.

२ शिकण्याच्या विषयाचें पूर्ण ज्ञान होईपर्यंत शंभर वेळां, हजार वेळां जरी तो तोंडानें पाठ करावा लागला अथवा हातानें लिहून काढावा लागला, तरी त्याप्रमाणें करणें.

३ लोकांची पर्वा न बाळगतां, आपल्यास योग्य दिसतील त्याच मार्गानें आपण हातीं घेतलेलें काम पुरें करणें.

४ आपणाला न येणारी गोष्ट अथवा विषय कमी योग्यतेचा असो अगर फार योग्यतेचा असो, तो आपणाला येईपर्यंत, मन लावून जिवाभावानें व कळकळीनें करावयाचा.

बाळांनो, वरील गुणांना तुम्ही वेडेपणा म्हणाल काय ?

## प्रसंग २

" एकमार्गीपणा तर असा होता कीं, एकदा जें करावयाचें तें कायम. माधवरावांची मुंज झाली, तेव्हां वय लहान होतें व मराठी शाळा सकाळीं उशीरा म्हणजे दहा वाजतां सुटे. तेव्हां भूक लागे. म्हणून आमच्या माई ( माधवरावांची सावत्र आई ) दशमी करून ठेवीत व माधवराव आल्यावर त्यावर तूप घालून त्यांना देत. एके दिवशीं नुकतें ताक केलें होतें. लोणी कढविलेलें नव्हतें. म्हणून माईनीं दशमीवर लोणीच घातलें. झालें ! गेली याची मर्जी ! हा आपला हट्ट धरून बसला, कीं रोजच्यासारखें पातळ तूप वाढ. 'तूप कढविलें नाहीं. उद्यां घालीन,' म्हणून माईनीं

पुष्कळ सांगितलें; पण नाहीं! तेव्हां माईनीं तुपाच्या तांबलींत चमचा-भर पाणी घालून तीं चुलीवर ऊन केली, व तांबली दशमीवर ओतली! त्याबरोबर याची समजूत होऊन हा मुकाट्यानें दशमी खावयास लागला! दुर्गी तेथें जवळच उभी होती; तिच्या हें लक्ष्यांत येऊन ती मोठ्यानें हांसून टाळ्या वाजवून, त्याला चिडवावयाला लागली कीं, 'दादा, तुला आईनें तूप म्हणून पाणी वाढलें!' पण माधवरावांनीं तिच्याकडे लक्ष दिलें नाहीं. आपली खालीं मान घालून दशमी खाल्ली व उठून गेला."

वर नमूद केलेल्या प्रसंगासारखे प्रसंग प्रत्येक घरामध्यें थोड्या फार प्रमाणांत घडत असतातच. त्यांचे योग्य अर्थ लावून पालक वागले तर किती तरी बालबंधूंचें कल्याण केल्यासारखें होईल. चालू प्रसंगाचा अर्थ लावतां लावतां माधवरावांच्या खालील गुणांचे अंकुर त्यांत दिसून येत नाहींत काय?

१ कोणताही नियम एकदां केला कीं मोडावयाचा नाहीं.

२ आपण केलेला नियम पाळण्याकरितां कितीही कडक वागणूक करावी लागली तरी करणें.

३ आपला नियम पाळतांना लहान अगर वडील माणसांची भीड न धरणें.

४ वडील माणसांनीं एकादे वेळ आपणास फसविलें, तरी त्यांचा आपण कधींही अपमान न करणें.

५ वडील माणसांनीं फसविल्यानें आपल्यास त्रास झाला अगर आपलें नुकसान झालें, तरी तें न बोलतां सोसणें.

मुलांनो, वरील गुणांना तुम्ही एककल्लीपणा म्हणूं नका. अशा प्रकारचे नियम स्वतःस लावून घ्या व त्याप्रमाणें आचरण करून

आपली खरी उन्नति तुम्ही जरूर करून घ्या.

### प्रसंग ३.

" माधवराव बहुतकरून दररोज सकाळीं शाळेंतून आल्यावर दशमी खाली कीं दुर्गीशीं एक सागरगोट्याचा डाव खेळून मग आंघोळीस उठावयाचा व पहिला तांब्या डोक्यावर घेतला कीं, पुरुषसूक्त म्हणण्यास आरंभ करावयाचा. त्यांत कोणीं मध्यें बोलून चुकविलें, कीं गेलें गाठोडें ! एकदां विठूमावोजींनीं ( विठू काकांनीं ) माधवरावाला संध्या करितांना थांबवून, संध्येंतलेंच कांहीं विचारिलें. त्याचें उत्तर दिल्यावर हा अडून बसला कीं, मी पहिल्यापासून पुन्हां संध्या करावयाचा नाहीं. कोठें थांबविलीत ती आणून द्या. मग पुढें संध्या करीन.' असा पुष्कळ वेळ हट्ट धरून बसला. संध्याही करीना व उठूनही जाईना. शेवटीं विठूभाऊजींनीं अर्धी संध्या करून 'आतां तूं पुढें एथून कर. एथें तुला मीं थांबविला,' असें म्हटल्यावर यानें एकदाची संध्या संपविली व उठून गेला. "

सद्गुणांच्या बालमूर्तींनो, वर वर्णन केलेल्या प्रसंगावरून आम्हीं पालकांनीं, वडील माणसांनीं मोठा गमतीचा बोध घेण्यासारखा आहे. पुष्कळ वेळां, वयानें मोठ्या भावाबहिणींना व कित्येक वेळां आईबापांनासुद्धां, लहान मुलें आपलें काम, आपला अभ्यास, आपला खेळ, यांमध्यें, आपल्या बालसमजुतीप्रमाणें, स्वतंत्रपणें, स्वतंत्र विचारानें, गुंग झालीं असतात, त्या वेळीं त्यांना उगीच डिवचून, अगर चिडवून, अगर त्यांना अडथळा करून, त्यांचा अगदीं विरस करण्याची खोड असते. मग त्यामुळें साहाजिकच लहान मुलें चिडतात व रडूं लागतात. त्यांना आपण नांवें ठेवितों. पण हें योग्य आहे काय ? अशा प्रसंगीं खरोखरी लहान मुलांच्याच वागणुकीपासून आपणच बोध घेतला

पाहिजे. सदरील माधवरावांच्या प्रसंगानें सुद्धां खालील गुणांवर प्रकाश पडण्यासारखा नाहीं काय ?

१ आपलें कोणतेंही नेमिलेलें काम नेमिलेल्या वेळीं नेमिलेल्या पद्धतीनेंच करणें.

२ आपलें ठराविक काम आपण करीत असतांना दुसऱ्यांनीं त्यांत अडथळा अगर लुडबूड केलेली न खपणें.

३ एका वेळेला एकच काम करणें व तें योग्य प्रकारें करणें.

---

# प्रकरण ५ वें.

## बालपणींचे आणखी कांहीं प्रसंग.

### प्रसंग ४

" सणवारीं गोफ, कडीं, व आंगठी मोठ्या खटपटीनें, आईनें याच्या आंगावर घातली तर, गोफ घातला म्हणजे त्यावरून गळ्याला धोतर गुंडाळावयाचें, कडीं बंडीच्या बाहींत मागें सारून ठेवावयाचीं; व आंगठीचा खडा हातांत पुढें वळवून मूठ मिटून ठेवावयाची; असा तर माधवराव सदा नीरसलेला असे. मी एकदां रागें भरलें कीं, ' माधव, तुझी आई इतक्या हौसेनें दागिने घालते. ते तूं कां बरें घालूं देत नाहींस ? घातले तर ते वेड्यासारखे झांकून कां ठेवितोस ? ' तेव्हां पण हें बाळ काय ह्मणालें ?— कीं, ' आपले घरीं रोज माधुकरी येतात, त्यांना कुठें ग असतात दागिने ! ' असें तर माधवाचें लक्षण आहे. आई तर काळजी करितां करितां मेली बिचारी ! आहे कुठें शहाणपण !

मुलांनो, सर्व प्रसंगांमध्यें या प्रसंगाचें चित्र व त्यावरून माधवरावांच्या आंगीं दिसून आलेले लहानपणींचे गुण देखील फारच उत्तम प्रकारचे होते असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. माधवरावांचे विचार

सर्व लहानथोर मुलांनीं, इतकेंच नव्हे तर थोर थोर वडील मंडळींनीं देखील नित्य मनांत वागविण्यासारखे व त्यापासून खालील बोधाचा ठसा आपल्या चित्तांत कायमचा कोरून ठेवण्यासारखे आहेत, असेंच सर्वांना कबूल करावें लागेल.

१ चांगले गुण हेच सर्व मानवजातीचे, त्यांच्या शरीराचे, मनाचे खरे भूषण आहेत, अलंकार नव्हेत.

२ कोणत्याही मनुष्यप्राण्यानें केवळ दागिन्यानें आपल्याला, आपल्या शरीराला शोभा आणण्याचा यत्न करणें कमीपणाचें आहे.

३ आपल्यापेक्षां गरीब स्थितींत असणाऱ्या लोकांचा विचार आपण प्रथम करावयास पाहिजे.

४ शरीराच्या सौंदर्याकडे अगर दागिन्यांच्या निरुपयोगी हौसेकडे न पाहतां आपण फक्त आपलें मन चांगलें ठेवावें. तेंच मोठें व उदार करण्याचा यत्न करावा.

## प्रसंग ५

"कोल्हापुरीं असतांना आमच्या घरीं (माधवरावांच्या घरीं) व कीर्तन्यांच्या घरीं (माधवरावांच्या एका स्नेह्यांच्या घरीं) कोजागरी पौर्णिमेला पुष्कळ ब्राह्मण व मित्रमंडळी बोलावून दूध द्यावयाची वहिवाट होती. व सगळ्या शाळेच्या मुलांना त्या दिवशीं रात्रीं दोन वाजेपर्यंत जागून सोंगट्या खेळण्यास परवानगी असे. त्याचप्रमाणें दोन्ही घरचीं सगळीं मुलें जमून सोंगट्या खेळत. माई (माधवरावांची आई) मरण्याच्या आधल्याच वर्षीं माधवाला नुकतें दहावें वर्ष लागलें असेल. कोजागरी आली तेव्हां कीर्तन्यांची मंडळी कशालाशी राजुरीस (परगांवीं) गेली होती. म्हणून या वेळीं घरांत मुलें कोणीच नव्हतीं. दुर्गी होती, पण ती आठ नऊ वाजतांच निजली. म्हणून खेळ-

ण्यास कोणीच नव्हतें. तरी रात्रीं भाऊसाहेबांचें जेवण झाल्यावर माधव मजजवळ सोंगट्या मागूं लागला. मी म्हटलें, दुर्गासुद्धां निजली, आणि मग तूं सोंगट्या कोणाशीं रे खेळणार ? तो म्हणाला, 'मी आपला कोणाशींही खेळेन; तूं दे म्हणजे झालें.' मीं सोंगट्या दिल्या; त्या घेऊन तो ओसरीवर गेला; आणि एक खांबाच्या पुढें बसून त्यानें सोंगट्यांचा डाव मांडला! एक हात आपला व एक खांबाचा असें म्हणून खेळण्यास सुरवात केली. दोन्ही डावांमध्यें खांबाकडून माधवानें आपल्यावर बिनतोडी घेतल्या. तेव्हां मी चिडवून म्हटलें, 'अरेरे ! एका माणसाची फजिती झाली ! लांकडाच्या खांबानें सुद्धां तुझ्यावर बिनतोडी द्यावी ना !' तेव्हां तो न चिडतां धिमेपणानें म्हणाला, 'मग त्यांत काय ? जें खरें तें खरेंच. खांबाच्या हाताला डाव पडले म्हणून त्याची तोडी आधीं झाली, मला पडला नाहीं म्हणून माझी झाली नाहीं. त्यांत कसली फजिती ?"

मुलांनो, पुष्कळ वेळां तुमच्या सारख्या निर्मल मनाच्या देवदूतांच्या, लहानपणींच्या, वेडगळ अजागळ दिसणाऱ्या, परंतु खरोखरी अर्थपूर्ण अशा बाललीलांचा खरा अर्थच आम्हां वडील म्हणविणाऱ्या आईबापांना, पालकांना अगर शिक्षकांना कित्येक वेळां समजून येत नाहीं. कांहीं वेळेला समजून आला तरीही, आमची तुमच्याविषयींची खरी जबाबदारी ओळखण्याची योग्यता अंगीं नसल्यामुळें आमच्या हातून तुमचें केवढें तरी नुकसान होऊन जातें. वर दिलेल्या माधवरावांच्या प्रसंगाचा अर्थ सुद्धां खालीं दिलेल्या सुंदर तत्त्वांनीं भरलेला नाहीं काय ?

१ आपला जोडीदार, आपला प्रतिस्पर्धी, आपला खेळगडी, दगड असो नाहीं तर देव असो त्याच्याबद्दल आपण योग्य तो आदर व

उदार वर्तन ठेवणें.

२ आपल्या प्रतिस्पर्ध्यास, आपल्या खेळगड्यास समजो न समजो, आपल्या मनाचा, आपल्या वागणुकीचा प्रामाणिकपणा, आपल्या उन्नतीकरितां कायम ठेवणें.

३ आपल्या प्रतिस्पर्ध्याशीं दोन हात करतांना, आपल्या खेळगड्या-बरोबर खेळतांना, अगदीं न चिडतां, मनाचा समतोलपणा ठेवणें.

४ आपल्या प्रतिस्पर्ध्याशीं अगर खेळगड्याशीं सामना देतांना अगर खेळ खेळतांना आपल्याला यश मिळो अगर अपयश येवो, खेळाकरितांच खेळ खेळणें आणि नेहमीं आपली खेळाडू वृत्ति, मनाची शांतता व धिमेपणा कायम ठेवणें.

बाळांनो, वर दिलेल्या गुणांची किंमत फारच थोर आहे; ते तुम्हीं आपल्या आंगीं सदैव वागविण्याचा यत्न करा व मोठे व्हा.

## प्रसंग ६

"एकदां माईनीं माधवरावांना बर्फी दिली, व त्याच्या दुसऱ्या हातांत थोडासा तुकडा देऊन, त्या म्हणाल्या कीं, 'हा तूं खा, व तो त्या मुलाला दे.' ल्हान तुकडा त्यांनीं आपल्या तोंडांत घालून मोठी वडी मोलकरणीच्या मुलाला दिली. मोलकरणीच्या मुलाच्या हातांत मोठी वडी पाहून माईनीं विचारलें कीं, 'याला ल्हान तुकडा द्यावयाचा, तर तूं मोठी वडी दिलीस आणि तूं लहान घेतलीस?' माधव म्हणाला 'तूं या हातांतील त्याला दे म्हणालीस, म्हणून तो दिला.' तेव्हां त्या हातांतील दे म्हणण्यांत आपली चूक झाली असें माईंच्या लक्षांत आलें."

बाळांनो, लहान मूल आणि खाऊ, दोन्ही गोष्टी किती गमतीच्या आहेत! लहान मुलें म्हटलें कीं खाऊची आठवण होते, खाऊ म्हटलें

र्की, ल्हान मुलांची आठवण होते. खाऊ म्हणतांच कोणत्या मुलाला आनंद होणार नाहीं ! एकादें गोड बालक पाहिलें म्हणजे त्याला खाऊ देऊन आनंदित करावें असें कोणाला वाटणार नाहीं ! माधवरावांच्या अशाच एका खाऊच्या प्रसंगाचें वर्णन वर आलेलें आहे. त्या वेळचें माधवरावांचें वर्तन मात्र किती बोधप्रद आहे ! त्याचा ठसा खालीं नमूद केल्याप्रमाणें लहानापासून थोरापर्यंत प्रत्येकानें आपले मनावर बिंबवून ठेवण्यासारखा आहे असेंच सर्वांना वाटेल.

१ आपणाला अतिशय आवडणारी वस्तु सोडण्याचा जरी प्रसंग आला तरी आपलें मन नेहमीं आपल्या ताब्यांत ठेवून वागणें.

२ वडिलांची आज्ञा पाळतांना आपल्याला शरीरानें अगर मनानें त्रास झाला तरी ती आज्ञा पाळणें.

३ आपल्या वागणुकीच्या चांगुलपणाकरितां आपल्या स्वार्थावर, आपणास प्रिय असलेल्या आपल्या फायद्याच्या वस्तूवर पाणी सोडावें लागलें, तरी त्यास तयार होणें.

४ श्रीमंती अगर गरिबी, धनीपणा अगर नोकरपणा असा फरक न पाहतां आपल्या स्वतःप्रमाणेंच सर्वांबद्दल आदर व सारखी वागणूक ठेवणें.

बालवाचकांनो, बालपणापासून माधवरावांची गरिबांविषयींची केवढी कळकळ व आज्ञाधारकपणाची शिस्त होती बरें ! खाऊच्या बाबतींत मुलांनीं मोह सोडून प्रामाणिकपणानें वागणें म्हणजे किती कठीण गोष्ट आहे, हें खाऊच्या वड्या वजन करून, लहानमोठ्यांकरितां भांडणाऱ्या बाळांना नवीन सांगण्याचें कारण नाहीं. तथापि माधवरावांनीं ती करून दाखविली ! त्यांच्याप्रमाणें आज्ञाधारक व सत्यनिष्ठ व्हावें, असें तुम्हांस मनापासून वाटतेंना! मग त्याप्रमाणें निश्चय करा व आपलें शील बनवा पाहूं.

———

## प्रकरण ६ वें,

### पितापुत्र.

माधवरावांचे वडील हे उदार मनाचे होते. ते आपल्या घरच्या मंडळींना चांगल्या प्रकारें वागवीत, इतकेंच नव्हे, तर लांबच्या नातेवाईकांना व इष्टमित्रांनाही मोकळ्या मनानें मदत करीत. माधवरावांच्या ऐन इंग्रजी शिक्षणाचे आरंभालाच त्यांच्या वयाच्या ११ वर्षी माधवरावांच्या आई गोपिकाबाई मृत्यु पावल्या, त्यामुळें माधवरावांच्याकडे त्यांच्या वडिलांचें लक्ष अधिकच लागलें. त्यांनीं माधवरावांच्या खाण्याजेवण्याची, कपडचालत्याची व शिक्षणाची काळजी फारच फार घेतली. माधवरावांच्या सुखसोयीकरितां त्यांच्याबरोबर ते मुंबईस शिकण्यास गेल्या वेळीं एक गडी, एक ब्राह्मण असे व्यवस्थेकरितां देण्यांत आले होते.

याप्रमाणें माधवरावांची शक्य तितकी उत्तम सोय करून त्यांच्या वडिलांनीं बापाचें कर्तव्य फारच छान प्रकारें बजाविलें होतें असेंच म्हटलें पाहिजे.

याशिवाय माधवरावांचे वडील गोविंदराव माधवरावांस कधींसुद्धां कडकपणानें वागवीत नसत, किंवा रागें भरत नसत. माधवरावांचें वर्तनही आपल्या वडिलांशीं फार मर्यादशील व चांगल्या मुलाला शोभेल असेंच होतें. वडिलांच्या पुढें जाऊन त्यांना एकादी गोष्ट विचारणें किंवा एकादी वस्तु मागणें या गोष्टी माधवराव करीत नसत. बहुतेक गोष्टी हुजऱ्याकडून अगर इतर वडील माणसांमार्फत कळवून आपलें काम करून घेण्याची पद्धत माधवरावांनीं लहानपणापासून ठेविली होती. वडिलांबरोबर बोलण्याचा प्रसंग कधीं आलाच, तर

माधवराव थोड्या शब्दांमध्यें व उभे राहून मर्यादेनें बोलत असत. ऐसपैस बसून चार गप्पागोष्टी वडिलांबरोबर करणें तर राहोच, पण जेवणाच्या वेळेशिवाय वडिलांच्या समोर बसण्याचें गैरशिस्त वर्तन माधवरावांनीं कधींच केलें नाहीं!

बाळांनो, माधवरावांच्या वडिलांची स्थिति श्रीमंतीची होती, म्हणून त्यांना गडी—ब्राह्मण देऊन माधवरावांची सोय करितां आली. सर्वांनाच याप्रमाणें कशी करितां येणार, असें तुम्ही म्हणाल! तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण सर्व पालकांनीं तुमच्याबद्दल शक्य ती काळजी आपापल्या परिस्थितीप्रमाणें घेऊन तुम्हांला चांगलें शिक्षण देऊन शहाणें करण्याचा प्रयत्न केला, तर तुम्हांला किती आनंद होईल बरें! तसेंच तुम्हांला “ शेंबडीं लेंबडीं पोरें! यांना काय कळतें! आम्हीं सांगूं तसें वागावें! ज्यास्त पंचाईत करूं नये. ’ असें म्हणून तुम्हांला नेहमीं तुच्छ मानलें, तुम्हांला कठोर शब्दांनीं दुखविलें तर तुमच्या शरीराची, मनाची व बुद्धीची चांगल्या प्रकारें वाढ होईल काय! ही झाली पालकांची गोष्ट. उलट बालबंधूंनो, तुम्हीही माधवरावांचें वडिलांशीं वर्तन कसें होतें, तें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे. हल्लीं पहावें तों लहान मुलांनीं वडील माणसांसमोर खुशाल उताणें, पाय वर करून, हवें तसें लोळावें; वडील माणसें बाहेरून आलीं तरी उठून त्यांचा आदर करूं नये; वडिलांशीं बोलतांना मर्यादा ठेवूं नये, वडील माणसांना हवें तें बोलून त्यांचा अवमान करावा, असें चाललें. हें तरी बरें आहे काय! माधवरावांच्या वर्तनाचा धडा पुढें ठेवून तुम्हीं सर्वांनीं त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय केल्यास तुमच्या वडिल माणसांना किती आनंद, किती समाधान होईल बरें! व तुमचेंही किती तरी कल्याण होईल बरें!

# प्रकरण ७ वें.

## विद्यादेवीचा निःसीम भक्त.

माधवरावांच्या वयाचीं तेरा वर्षें कोल्हापुरास गेलीं. तोंपर्यंत त्यांच्या मराठी शिक्षणाचा पाया पुरा होऊन इंग्रजी शिक्षणास आरंभ झाला होता. माधवरावांचा मुंबईस राहून शिक्षण घेण्याचा नाद चालूच होता. माधवरावांना मुंबईस ठेवण्याच्याविरुद्ध त्यांच्या आई गोपिकाबाई या होत्या. कारण गोपिकाबाईंना बरींच मुलें झालीं, त्यांपैकीं माधवराव व दुर्गा एवढींच त्यांना लाभलीं. त्यामुळें एकुलता एक मुलगा, वयाच्या तेरा—चौदाव्या वर्षी आपल्यापासून दूर रहावा व तोही मुंबईसारख्या ठिकाणीं, या विचारानें आईच्या अंतःकरणास दुःख वाटणें साहाजिक होतें. पण गोपिकाबाई माधवरावांना अकरावें वर्ष लागतांच मरण पावल्या व माधवरावांचा मातेच्या प्रेमाचा ओलावा नाहींसा झाला. त्यामुळें माधवरावांच्या मनानें, आतां दूर जाऊन आईच्या प्रेमाची उणीव विद्यादेवीच्या पूजनानें भरून काढण्याचें ठरविलें व ते सन १८५६ च्या शेवटीं शेवटीं विद्याभ्यासाकरितां मुंबईस गेले. तेव्हांपासून माधवरावांच्या खऱ्या शिक्षणास व चरित्रास आरंभ झाला असें दिसून येतें.

मुंबईस आल्यावर माधवरावांनीं आपलें नांव एल्फिन्स्टन हायस्कुलांत घातलें. कोल्हापुरास असेपर्यंत बालवयामुळें व संकुचित वातावरणामुळें माधवरावांच्या बुद्धीचा व गुणांचा व्हावा तितका विकास होण्यास अवसर मिळालेला नव्हता. परंतु आतां एक प्रकारची स्वतंत्रता मिळून, मुंबईसारख्या वैभवाच्या व सर्वांगसुंदर शिक्षणाच्या ठिकाणीं रहावयास मिळाल्यामुळें, माधवरावांच्या शरीराची, मनाची,

बुद्धीची व इतर गुणांची वाढ झपाट्यानें होऊं लागली. पूर्वजांच्या पुण्याईनें माधवरावांचा बांधा व शरीरसामर्थ्य चांगलें होतें व त्यालाच बालपणींच्या योग्य काळजीची व गृहशिक्षणाची चांगली जोड मिळाल्यामुळें सर्व बाजूंनीं माधवरावांचा विकास होण्यास मदतच होऊं लागली.

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, माधवरावांच्या तोडीचे इतर विद्यार्थीही असतात, नाहीं असें नाहीं; पण त्यांना माधवरावांच्यासारखा सर्व अनुकूल परिस्थितीचा फायदा मिळतोच असें नाहीं. राहण्याची, जेवणाखाण्याची, कपड्यालत्याची, लागतील त्या पुस्तकांची व विपुल पैशांची हवी तशी जोड सर्वांनाच लाभणें शक्य नाहीं. तसेंच हेंही खरें आहे कीं, पुष्कळ श्रीमंतांचीं मुलें, चांगलें साधन असून, चांगलीं बुद्धिमान् असूनही वाया जातात. तेव्हां माधवरावांच्या बाबतींत परमेश्वराच्या कृपेनें व त्यांच्या वाडवडिलांच्या पुण्याईनें व तपश्चर्येनें दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें. उत्तम संस्काराचे सुपुत्र माधवराव, शिक्षणाचीं सर्व साधनें पुरविणारे पालक व मनापासून ज्ञान देणारे थोर मनाचे शिक्षक या सर्वांचा त्रिवेणी-संगम झाल्यामुळें माधवरावांसारखा सर्व हिंदुस्थानाला सुस्थितीच्या मार्गावर आणून उन्नतीच्या मंदिराकडे खेंचणारा खरा अष्टपैलू हिरा मिळाला.

---

## प्रकरण ५वें

### विद्यार्थिदशा.

माधवराव मुंबईस आल्यानंतर लौकरच त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची, दीर्घोद्योगाची व स्वभावाच्या थोरपणाची छाप त्यांच्या

विद्यार्थिबंधूंवर व शिक्षकवर्गावर हळूहळू पडूं लागली व त्यांचें परस्परांचें स्नेहसंवर्धन व स्वभावपरिपोष वगैरे गोष्टी साधण्यास अधिकच सवलत मिळूं लागली.

माधवरावांचें शाळेंतील वर्तन फारच एकांगी असे. हा त्यांचा एक प्रकारचा दुर्गुण होता असेंही म्हणतां येईल. परंतु त्यांच्या बाकीच्या असंख्य गुणांमुळें या एका दोषाची छाया म्हणजे चंद्राच्या बिंबावर असलेल्या काळ्या डागाप्रमाणें, गालबोट म्हणून, त्यांच्या अत्यंत थोर स्वभावाची शोभा वाढवीत आहे असें म्हणणेंच योग्य वाटतें. माधवरावांना आपण होऊन विद्यार्थ्यांत मिसळण्याची, त्यांच्याशीं ओळखी करण्यांत अगर गप्पागोष्टी करण्यांत किंवा शाळेंतील तालमींत अगर इतर खेळांत भाग घेण्याची आवड नव्हती असेंच दिसतें. विद्यार्थी या नात्यानें पाहिल्यास, हा त्यांच्या स्वभावाचा दोष होता; तो त्यांनीं घालवावयास पाहिजे होता. निदान त्यांच्या पालकांनीं तरी त्याबद्दल प्रयत्न करावयास पाहिजे होता. परंतु माधवरावांना फारच लौकर मुंबईसारख्या ठिकाणीं पालकांपासून दूर राहावें लागल्यामुळें व त्यांच्या अभ्यासाच्या जबर व्यासंगामुळें त्याकडे त्यांना लक्ष देतां आलें नाहीं. त्यामुळें हा त्यांचा दोष शेवटपर्यंत थोड्या-फार प्रमाणांत शिल्लक राहिला होता असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

विद्यार्थ्यांच्या कर्तव्याविषयीं माधवरावांइतकी निष्ठा फारच थोड्या विद्यार्थ्यांमध्यें दिसून येते. अगदीं लहानपणापासून माधवरावांना शाळा चुकविणें अगर आपल्या अभ्यासांत हयगय करणें या गोष्टी माहीतच नव्हत्या. इतकेंच नव्हे, तर जो विषय आपणास शिकावयाचा, त्याच्याविषयीं त्यांची इतकी कळकळ असे कीं, शिक्षकांनीं शाळेंतील अभ्यासक्रमाप्रमाणें शिकवून विद्यार्थ्यांना जें

ज्ञान व्हावयाचें त्यामध्यें माधवरावांचें समाधान कधींच होत नसे. माधवरावांची भावना अशी होती कीं, विद्यार्थ्यानें शाळेंतील केवळ क्रमिक पुस्तकांवर कधींही संतुष्ट राहातां उपयोगी नाहीं. याकरितां माधवराव शाळेंत जो विषय नेमला असेल त्या बाबतचीं क्रमिक पुस्तकें शाळेंतील शिक्षकांपासून शिकत असत, व शिवाय आपल्या ज्ञानाच्या लालसेमुळें, त्या विषयावरील साधारणपणें जितकीं पुस्तकें उपलब्ध असतील व जितकीं वाचणें पूर्ण ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीनें जरूर वाटेल, तितकीं स्वतःकरितां स्वतः होऊन वाचून काढीत! त्याबद्दल विचार करून मनन करीत; त्या पुस्तकांतून त्या त्या विषयाचीं टिपणें व सारांश काढून लिहून ठेवीत व मग जरूर पडल्यास, गुरुजनांची मदत घेऊन सर्व विषय अगदीं उत्तम प्रकारें ग्रहण करून, नंतरच दुसऱ्या विषयाकडे वळत असत!

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माधवरावांचें तत्व असें होतें कीं, मनुष्यप्राणी हा जन्मभर विद्यार्थी आहे. अभ्यास करण्याकरितां, आपल्या परिस्थितीचें, आपल्या भोवतीं प्रकट झालेल्या सृष्टीच्या मंदिरांतील सर्व वस्तूंचें, सर्व जगांतील ज्ञानभांडाराचें निरीक्षण करून, स्वतःची सर्वांगीण उन्नति करून घेण्याकरितांच तो जन्माला येत असतो, व त्याप्रमाणेंच नेहमीं जाणीव ठेवून त्यानें वागलें पाहिजे. अशा प्रकारचें माधवरावांचें तत्व होतें.

अभ्यास व वाचन हाच माधवरावांचा देव होता. अभ्यासाकरितां, ज्ञानाच्या आवडीकरितां, व वाचनाकरितां, माधवरावांनीं आपल्या शरीरप्रकृतीकडे देखील अतिशय दुर्लक्ष केलें होतें. इतके ते आपल्या ध्येयाशीं एकरूप होऊन जात असत. शेवटीं त्यांच्या या अभ्यासामुळें व वाचनामुळें त्यांची दृष्टि कायमची अधू होऊन ती जन्मभर

तशीच राहिली !

माधवरावांची मुंबई-युनिव्हर्सिटीची परीक्षा सन १८५७ सालीं उतरली. त्यानंतर ते एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें उच्च शिक्षण घेऊं लागले. तेथें सन १८६० पासून सन १८६६ पर्यंत माधवरावजींना फेलो या नात्यानें, सन्मान्य विद्यार्थी म्हणून, कॉलेजमध्यें अध्यापनाचें काम करण्याची संधी मिळाली व त्याबद्दल त्यांना, जुनिअर फेलो असतांना दरमहा रु. ६० व सीनीअर फेलो असतांना रु. १२५ अशी छात्र-वृत्ति मिळत असे. माधवराव हे १८६२ मध्यें बी. ए. ची परीक्षा सन्मानानें पहिल्या वर्गांत पसार झाले. १८६४ सालीं एम्. ए. झाले. व १८६६ सालीं दोन्ही एल्एल्. बी. च्या परीक्षा उत्तीर्ण झाले.

माधवरावांच्या विद्यार्थिदशेची आणखी कल्पना येण्याकरितां माधवरावांच्या विद्यार्थिदशेचें वर्णन रा. दिनशा वाच्छा व कै. प्रो. आबाजी विष्णु काथवटे यांनीं केलेले खालीं दिलेलें आहे.

## रा. दिनशा यांचें वर्णन.

" माधवरावांच्या बरोबरीच्या इतर विद्यार्थ्यांना त्यांची चिकाटी, धिमेपणा आणि वाचनलालसा या गुणांमध्यें बरोबरी कारितां येत नव्हती. धिमेपणा व चिकाटी हे मराठ्यांच्या स्वभावाचे गुणधर्मच आहेत. पण रानडे विद्यार्थी असतांना हा चिकाटीचा जन्मसिद्ध गुण पराकाष्ठेस पोंचलेला आढळून येत असे. आमच्यांतील कांहींजण माधवरावांना विनोदानें " बाल मतंगज " ( हत्तीचें पिलूं ) म्हणत असत. त्यांच्या शरिराचा बांधा धिप्पाड व ओबडधोबड असल्यामुळें, हत्तीची उपमा सहज सुचे. रानडे भावी आयुष्यांत अप्रतिम विद्वान म्हणून गाजणार याविषयीं आमच्यामध्यें कोणाचेंही द्विधा मत नव्हतें. पुढें त्यांच्या सार्वजनिक आयुष्यामध्यें जे गुण प्रकट झाले, ते, अविश्रांत

श्रम करणारे एक विद्यार्थी या नात्यानें या काळांतही लक्षांत येत असत. शहरच्या चालचलणुकीचा किंवा शिष्टाचाराचा गंध त्यांच्या आंगीं जडला नसल्यानें, आपण कांहीं विचित्र आचरण करीत आहों हें ध्यानांत न येतां, ते एखाद्या बाकावर बसत व समोरच्या टेबलावर पाय ठेवून, डोक्यावर पगडी आहे कीं आपण बोडकेच आहोंत, याची फिकीर न बाळगतां, वाचण्याला प्रारंभ करीत ! आणि दुपारपासून तिन्ही सांजापर्यंत एकाग्र चित्तानें, क्षणाचीही विश्रांति न घेतां वाचन चालवीत! एकदां स्वारी वाचनांत गर्क झाली कीं, मग त्यांना सभोंवतीं काय चाललें आहे याचें मुळींच भान उरत नसे !"

## प्रो. काथवटे यांचें वर्णन.

" मीं माधवरावांची विद्यार्थिदशा पाहिली आहे, आणि तेव्हांपासूनच माझ्या चित्तांत त्यांजबद्दल आदर उत्पन्न झाला. विशेषत: अभ्यासावरील त्यांची अव्यभिचारिणी ( एकमार्गी ) भक्ति पाहून मला फारच आदर वाटत असे. टाऊनहालांत परीक्षा चालू असतां एक पेपर आटोपला म्हणजे दुसरा पेपर सुरू होण्यापूर्वीच्या वेळांत ते पुस्तक घेऊन वाचूं लागत; आणि दुसरा पेपर लिहिण्यास जाण्याची वेळ झाली असें जेव्हां कोणीतरी सांगावें,तेव्हां ते पुस्तक ठेवून देत ! इतकें त्यांना वाचनाचें वेड होतें. ते अभ्यासाचा एक मूर्तिमंत अवतारच होते असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं !"

बालवाचकांनो,माधवरावांच्या ठिकाणीं विद्यादेवीबद्दल किती आदर, किती भक्ति होती, दीर्घोद्योग, सतत अभ्यास, निरंतरचें वाचन व मनन यांनीं विद्यादेवीची त्यांनीं कशी उपासना केली हें नीट लक्षांत ठेवून त्याप्रमाणें तुम्ही आचरण करण्याचा प्रयत्न करा. तसेंच लहानपणीं उगीच मंदबुद्धि, मैंद, अजागळ, अशा दिसणाऱ्या व लोकांकडून

वेळोवेळीं निंदा होणाऱ्या बालबंधूंनीं लोकांच्या तशा अविचाराच्या बोलण्याला महत्त्व देऊं नये. तुमच्या ठिकाणीं ईशकृपेनें कितीतरी सामर्थ्य भरलें आहे, त्याचा ठाव तुमच्या पालकांना लागत नाहीं व कित्येकवेळां गुरुजींनाही लागत नाहीं! याकरितां निराश होऊं नका! माधवरावांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवा आणि आपल्या ठिकाणच्या गुणांच्या अंकुरांचें नीट निरीक्षण करून ते वाढविण्याचा यत्न करा. परमेश्वर तुम्हांस तुमच्या प्रयत्नांत यश दिल्याशिवाय राहणार नाहीं.

---

## प्रकरण ९ वें,

### शिक्षणाची जागा व शिक्षक.

बालबंधूंनो, सुंदर वस्तु कोणाला आवडणार नाहीं? मनुष्य अजाण असो अगर सुजाण असो, लहान असो अगर थोर असो, सौंदर्याचा मोह सर्वांनाच सारखा वाटल्याशिवाय रहात नाहीं. प्रत्येक लहान मुलाला, आपणाला सुंदर कपडे असावेत, सुंदर वस्तु खेळण्यास असाव्यात; सुंदर पुस्तकें, चित्रें, वाचण्यास, पाहण्यास मिळावींत; राहावयाला छानदार बंगला असावा, त्याचे भोंवतीं टुमदार बागबगीचा असावा; आपली खोली उत्तम असावी; बसावयाला सुंदर खुर्ची, त्यापुढें लिहावयाला लहानसें सुबक टेबल असावें; उत्तम दौत, छानदार कागद, रंगदार पेन्सील, टाकलेखण्या ठेवण्यास इवलीशी पेटी, कपाट, झोंपण्यास सुंदर बिछाना आणि सर्वांत श्रेष्ठ म्हणजे खाण्याला सुंदर गोड खाऊ........वगैरे वगैरे किती तरी सुंदर बाबी आपणास असाव्यात असें वाटत असतें! ही खाजगी गोष्ट झाली. त्याचप्रमाणें आपण ज्या ठिकाणीं विद्याभ्यास करण्यास, ज्ञान संपादन करण्यास जातों, तें

शाळागृह, कॉलेज उत्तम असावें, दिखाऊ असावें, शृंगारलेलें असावें, त्याचे समोंवतीं उत्तम बागबगीचा, सर्व प्रकारचीं उत्तम साधनें असावीत; असें कोणच्या विद्यार्थ्यास वाटणार नाहीं? अशाच शाळेमध्यें विद्यार्थ्यांना जाऊन शिकण्याची संधि मिळाल्यास त्यांना बाहेरच्या सुंदर परिस्थितीमुळें आनंद झाल्याशिवाय राहील काय? शाळागृहाची, विद्यालयाची—ज्या ठिकाणीं ज्ञानाचा लाभ दिला जातो, उच्च व थोर-थोर विचारांचा ठसा विद्यार्थ्यांच्या कोमल मनावर उमटविला जातो, त्या शाळागृहाची परिस्थिति, उदात्त, गंभीर व सर्व प्रकारच्या उत्तम विचारांना पोषक अशीच असणें योग्य नाहीं काय? विद्यादेवी ही एक विद्यार्थिजनांची पवित्र देवता आहे. शाळागृह, विद्यालय हें विद्यादेवीचें पवित्र मंदिर आहे. अशा विद्यादेवीच्या पवित्र मंदिरांमध्यें जाण्यास मिळणें ज्ञान मिळविण्याकरितां कांहीं काल राहण्याचा सुप्रसंग येणें, या गोष्टींचा बालकांचे बालमनांवर फारच चांगला परिणाम होत असतो. हेच होणारे परिणाम व संस्कार लहानथोर विद्यार्थ्यांच्या साऱ्या आयुष्यभर जसेच्या तसे कायम रहात असतात. इतकेंच नव्हे, तर विद्यार्थिदशा संपून थोरपणीं हाच विद्यार्थी प्रपंच, संसार करूं लागला, म्हणजे त्याच्यावर येणाऱ्या कांहीं कठीण, कांहीं वाईट प्रसंगांतून पार पडण्यास लहानपणींचे प्रसंग व त्यांचा झालेला परिणाम त्यास फार उपयोगीं पडत असतो.

शाळागृहाच्या बाहेरची परिस्थिति, इमारत, सामानसुमान, बागबगीचा, व्यवस्था, टापटीप सर्व चांगली व उदात्त असावी. हें तर जरूर आहेच, पण तेवढ्यानें खरा, चांगला, नमुनेदार विद्यार्थी तयार होईल काय? शाळेच्या इमारतीबरोबरच त्या शाळेंत शिक्षण देणारे शिक्षकही थोर मनाचे, थोर अंतःकरणाचे, उदार मताचे, उत्तम

विचाराचे, उत्तम आचाराचे, थोर शीलाचे व खरे कर्तृत्ववान् असावयास नकोत काय? ज्या शिक्षकाचा, ज्या शिक्षकाच्या शिक्षणाचा, आचारविचारांचा आरसा, नमुना, नेहमीं विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनापुढें राहाणार, ते शिक्षक अनुकरण करण्याला योग्य असेच असावयास नकोत काय?

बालवाचकांनो, माधवरावांच्या वेळची परिस्थिति थोडी निराळी होती. हल्लींच्या शाळागृहांतील नमुनेदार इमारती, अगर फूट-हात मोजून तयार केलेली जागा अगर खिडक्या तावदानें पाहून पसंत केलेली अशी जागा, शाळेकरितां माधवरावांच्या वेळेला नव्हती हें खरें; परंतु शिक्षणाचें काम हल्लींच्यापेक्षां बरेंच सकस होत असावें असें दिसतें. त्या वेळीं विद्यार्थी हल्लींपेक्षां कमी असत; परंतु ते चांगले बुद्धिमान् व होतकरू असेच असत. अध्यापक हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या अभ्यासावर स्वतंत्रपणें लक्ष ठेवून त्याची खरी प्रगति कशी होत आहे हें पहात असत व त्याच्यामध्यें दिसून येणाऱ्या निरनिराळ्या गुणांच्या अंकुरांना वाढण्यास चांगली मदत व्हावी व ते गुण चांगले वाढून पूर्ण दशेला यावेत अशी शिक्षकांना फार हौस असे. त्यामुळें त्या वेळच्या विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारें शिक्षण घेऊन, उत्तम प्रकारचें ज्ञान संपादन करण्यास मुळींच अडचण वाटत नसे.

शिक्षणाचें पवित्र कार्य करणारे शिक्षक लोक हे खरोखरी दूरवर व बारकाईनें विचार केला असतां सर्व जगाच्या भावी पिढीची उलटापालट करणारे किमयागार आहेत असेंच दिसून येईल. त्यामुळें त्यांच्यावर केवढी जबाबदारी आहे हें निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. एवढ्याचकरितां शिक्षकवर्ग किती थोर, किती साधुवृत्तीचा, जगाच्या खऱ्या कल्याणाकरितां किती झटणारा व किती तपस्वी

असावयास पाहिजे, पहा बरें !

तसेंच विद्यार्थ्यांचें कल्याण साधण्याकरितां शिक्षकांना दुसरीही तितकीच एक कठोर कामगिरी करावी लागत असते. शिक्षक अंतःकरणाचे दयाळू असले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरितां झटणारे असले तरी प्रत्यक्ष शिक्षण देण्याच्या बाबतींत शिक्षकांचें मन शिस्तीचाच पुरस्कार करणारें व विद्यार्थ्यांना शिस्त लावण्याकरितां तितकेंच खंबीरही असलें पाहिजे.

माधवरावांच्या वेळचे शिक्षक विद्याज्ञान देण्याचें पवित्र कर्तव्य, जबाबदारीची पूर्ण जाणिव ठेवून, स्वतःच्या आवडीनें करीत असत. त्यांत भाडोत्री बुद्धि नव्हती. त्या वेळचे शिक्षक विद्यार्थ्यांची खरी व पूर्ण सर्वांगीण उन्नति होण्याकरितां व्यक्तिशः काळजी घेण्याचा यत्न करीत व ती कायम टिकावी म्हणून विद्यार्थ्यांच्याच ठिकाणीं खरी ज्ञानाची आवड उत्पन्न करून त्यांना ज्ञानवान करून सोडीत. हल्लींच्या शिक्षकवर्गापैकीं किती शिक्षक वरील पवित्र विचारसरणीचा अवलंब करणारे असतील हें वाचकांवरच सोपवणें श्रेयस्कर होईल असें वाटतें.

माधवरावांच्या वेळचे शिक्षणाचें धोरण व शिक्षणाचें काम कोणत्या दिशेनें केलें जात होतें, याची कल्पना त्या वेळचे प्रो. फ्रिअर साहेब यांनीं विद्यार्थ्यांना उपदेश केला आहे त्यावरून दिसून येणार आहे. ते ह्मणतातः—

" तुमच्यावर केवळ विद्यापीठाचीच कीर्ति अवलंबून नाहीं. समाजाची नीति तुमच्यावर अवलंबून आहे. तुम्ही विश्वविद्यापीठाचे पदवीधर आहांत. तुमच्या वर्तनांत सगळ्या सुशिक्षित जगाचे गुण दिसावयास पाहिजेत. विशिष्ट सरकारचे, समाजाचे अथवा देशाचे गुण

तुमच्या वर्तनांत दिसल्यानें इतिकर्तव्यता होणार नाहीं. तुम्हांस जें शिक्षण मिळालें आहे, त्या शिक्षणानें सामाजिक नीतिमत्ता लयास जाते; तुम्ही वडील मंडळीची अवज्ञा करूं लागतां, गर्विष्ठ आणि अहं-मन्य बनतां; असा शिक्षणावर एक आरोप आहे; तो तुम्हीं दूर केला पाहिजे. विद्या आणि नीतिमत्ता यांचा परस्परसंबंध आहे, हें नित्य लक्षांत असूं द्या. तुम्हांला जर शहाणें आणि विद्वान व्हावयाचें असेल तर विद्यापरायणतेला, उच्च प्रतीच्या निर्मळ बुद्धिमत्तेप्रमाणेंच अंतः-करणाची पवित्रता, शुद्धता आवश्यक आहे हें कधींही विसरूं नका."

बालवाचकांनो, माझी खात्री आहे कीं, आपले शिक्षक कोणत्या दर्जाचे, कोणत्या स्वभावाचे, हें, तुम्ही जरी लहान असलां तरी खास ओळखीत असलां पाहिजे. पशु, पक्षी यांसारखीं मुकीं जनावरें सुद्धां आपलें पालन करणाऱ्याची सहवासानें पुरी पारख करूं शकतात, मग तुम्ही तर बुद्धिमान माणसें आहांत; परमेश्वराचे अंश आहांत; तर मग तुम्हांला तुमच्या शिक्षकांची पारख करितां येणार नाहीं काय ? येईल, खास येईल ! म्हणून तुम्ही आपल्या शिक्षकांची पारख करून ठेवीत जा. त्याप्रमाणें आपल्या शिक्षकांच्या स्वभावधर्माची ओळख आपल्या आईबापांना, पालकांना वारंवार करून देत जा. शिक्षकपणाच्या खऱ्या कसोटीला न उतरणाऱ्या शिक्षकाच्या सहवासानें आंधळेपणानें आपल्या सर्व भावी आयुष्याचें व गुणाचें मातेरें करून घेऊं नका. पण याच वेळीं ही गोष्ट पूर्ण लक्षांत ठेवा कीं, वरील गोष्टींची पालकांना जाणीव करून देणें वगैरे अगदीं नम्रपणानें, योग्य प्रकारें, कोणाच्याही मनास अगर कोणत्याही गुरुजनाला दुखवि-ण्याचे हेतूनें, अथवा अपमान होईल अशा रीतीनें, करूं नका ! गुरु-जनांचें मन वळवून त्यांना जाणीव उत्पन्न करून देण्याच्या बुद्धीनें,

तुमचें, बालकांचें एक स्वतःबद्दलचें पवित्र कर्तव्य म्हणून करा व आपली उन्नति करून घेण्याचा यत्न करा. आणि आपणांस आदर्श-भूत शिक्षकवर्ग सदैव लाभावा म्हणून मनोभावानें परमेश्वराची नित्य प्रार्थना करीत रहा.

---

## प्रकरण १० वें,

### माधवरावांची शिकविण्याची पद्धति.

माधवरावांचें विद्यादानाचें काम ते कॉलेजमध्यें विद्यार्थी असल्या-पासून, फेलो या नात्यान सन १८६१ पासूनच सुरू झालें होतें, ते सन १८७१ पर्यंत म्हणजे सुमारें दहा वर्षें सुरू होतें. शिक्षकाचें काम करितांना सुद्धां त्यांची विशाल बुद्धि, काम करण्याची विशेष हातोटी व दीर्घोद्योग हीं दिसून आल्याशिवाय राहात नसत. माधव-राव बहुतेक सर्व विषय शिकवीत असत. त्यांतल्या त्यांत इतिहास व अर्थशास्त्र हे विषय त्यांच्या आवडीचे होते, असें दिसतें. तथापि कोणताही विषय शिकविण्यास दिला तरी त्यांनीं त्याबद्दल कधीं नापसंती दर्शविली नाहीं. उलट, विषय नवीन आहे, कठीण आहे, म्हणून विशेष काळजीनें त्याचा सांगोपांग अभ्यास करण्याकरितां त्या विषयावरील सर्व पुस्तकें वाचून, त्यांतून टिपणें काढून स्वतःची पूर्ण खात्री झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिकविण्याची योजना ते करीत असत. कसलाही कठिण अगर नीरस विषय असला तरी तो विषय शिकवितांना मुलांना त्याची गोडी लागावी, तो सुलभ वाटावा म्हणून माधवराव हे त्या विषयाबद्दलची शिकविण्याची स्वतःची पद्धत अति-शय काळजीपूर्वक बसवीत व विद्यार्थिवर्गाचा फायदा करून देऊन

त्यांच्या ज्ञानाची वरवर वाढ न दाखवितां त्यांच्या पदरांत खरेंखुरें ज्ञानदान टाकीत असत; त्यामुळें एखादा विषय माधवरावांच्या मुखांतून त्यांच्या पद्धतीनें शिकविला गेला कीं, विद्यार्थ्यांचें त्या विषयांचें ज्ञान पूर्ण होत असे!

पुष्कळ शिक्षकांचें असें मत झालेलें दिसतें कीं, आपण शिक्षक; आपण विद्यार्थ्यांच्यासारखा घरीं अभ्यास काय करावयाचा! आणि विषयांचीं टिपणेंही वर्गांत न्यावयाचीं ह्मणजे खास कमीपणाच! परंतु माधवरावांचें कोठलेंही काम वेळ मारून नेण्यापुरतें नसेच, त्यामुळें स्वतः जो विषय शिकवावयाचा त्याचा अभ्यास करून, त्याचीं टिपणें काढावयाचीं, इतकेंच नव्हे तर तीं टिपणें वर्गामध्यें शिकावितांना नेऊन सर्व प्रकारें विद्यार्थ्यांना नेमलेल्या विषयाचें सांगोपांग ज्ञान करून देण्याची त्यांची पद्धत ठरलेली असे. पुष्कळ वेळां ज्या शिक्षकाची अगर विद्यार्थ्यांची केवळ परीक्षा पास करणें अगर होणें एवढीच महत्वाकांक्षा असेल, त्याकरितां लहान लहान पुस्तकांचें जरी तेवढ्यापुरतें वाचन केलें, तरी केवळ परीक्षा पास होण्याच्या दृष्टीनें तयारी होईल; परंतु परीक्षेची तात्पुरती तयारी म्हणजे त्या विषयाचें पूर्ण ज्ञान नव्हे. माधवरावांचा बाणा असा असे कीं, खऱ्या ज्ञानाकरितां शिकावयाचें व खऱ्या ज्ञानदानाकरितांच शिकवावयाचे. अशा प्रकारचा शिक्षकांचाच रोख असल्यावर त्यांचे विद्यार्थीही बहुतांशीं त्याच विचाराचे निघाल्यास नवल नाहीं. परंतु हल्लींप्रमाणें त्याही वेळीं केवळ परीक्षा पास होण्याचे हेतूनेंच शाळेंत येणारे व शिकणारे विद्यार्थी होतेच. त्यामुळें सर्वांनाच माधवरावांची पद्धत आवडत असे, असें नाहीं. परंतु आपल्या स्वतःच्या समाधानाकरितां, आपल्या कर्तव्यकर्माच्या जाणीवेनें, आपल्या अगाध ज्ञानाचा ठेवा माधव-

रावांनीं सर्व विद्यार्थ्यांपुढें ठेवण्याची केव्हांही कसूर केली नाहीं.

कोणताही विषय शिकवावयाचा झाला तरी त्या विषयावरील निरनिराळ्या लेखकांचीं पुस्तकें काळजीपूर्वक वाचून, सर्वांच्या दृष्टीनें साधकबाधक विचार करून, त्या विषयाची एकमेकांच्या विचारांशीं व मांडणीशीं तुलना करून, नंतर त्या विषयाबद्दल स्वतःचा पूर्ण विचार ठरवून, मगच त्या विषयाबद्दलचें आपलें मत बनविण्याची माधवरावांची दृष्टि होती; व तीच दृष्टि त्यांनीं आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षण देतां देतां त्यांचे ठिकाणीं आणण्याचा यत्न केला होता. केवळ एकाच ग्रंथकाराच्या मतावर अवलंबून राहून, केवळ एकाच्याच विचारसरणीवर विश्वास ठेवून, अगर त्यालाच प्रमाण मानून विषय शिकणें अगर शिकविणें, हें माधवरावांना कधींच रुचत नसे व त्यांनीं तसें कधींही केलें नाहीं.

बाळांनो, माधवरावांसारख्या गुरुजनांबद्दल विद्यार्थ्यांकडून अगर जनतेकडून धन्यवाद मिळाल्यास आश्चर्य नाहीं ! तुम्हांलाही माधवरावांसारखें, विद्यार्थी म्हणून अगर शिक्षक म्हणून, नांवालौकिकास चढावें, असें वाटणार नाहीं काय ? पण त्यांच्या मोठेपणाबरोबरच त्यांचे गुणही आंगीं आणण्याचा यत्न करा ! म्हणजे तुम्हीही माधवरावांच्यासारखे नमुनेदार विद्यार्थी व उत्तम अध्यापक व्हालच व्हाल, यांत मुळींच शंका नाहीं !

---

## प्रकरण ११ वें,
### नोकरीचे प्रकार.

आपला प्रत्येकाचा साधारण अनुभव असा आहे कीं, कसेंबसें स्वतःच्या शिक्षणाचें कार्य संपवून, कशीबशी एखादी नोकरी पोटापाण्यापुरती करण्यास सुरवात केली, कीं आपल्या जीविताची इतिःकर्तव्यता झाली, असें आपणांस वाटत असतें. एकच नोकरी का होईना, पण ती तरी अगदीं उत्तम प्रकारें, अगदीं आपल्या म्हणा अगर इतरांच्या म्हणा, मनाला समाधान प्राप्त करून देण्यासारखी जरी एकाद्यानें करून दाखविली, तरी त्याला सुद्धां चांगलें कर्तव्य बजावलें म्हणून धन्यवाद द्यावा असें आपणांला क्षणभर वाटल्याशिवाय राहात नाहीं. मग माधवरावांसारख्या बहुगुणी व शतावधानी मनुष्यानें एकाच आयुष्यामध्यें जी विविध प्रकारची–फक्त नोकरी या नात्यानें पाहिलें तरी–कामगिरी निरनिराळ्या प्रकारच्या नोकरीच्या रूपानें केली, व ती ज्या प्रकारानें व ज्या मनोभावनेनें केली, त्याकडे पाहिल्यास त्यांच्यासारखा लोकोत्तर महापुरुष एकाद्या राष्ट्रामध्यें निर्माण होणें, हें त्या राष्ट्राचें, त्यांतील समाजाचें व लोकांचें मोठें भाग्यच होय असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं!

माधवरावांच्या नोकरीचे प्रकार पाहिले म्हणजे त्यांना त्यांचें एकच आयुष्य कसें पुरें पडलें याचें आश्चर्य वाटतें! माधवरावांची विद्यार्थी व अध्यापक या नात्यानें आतांपर्यंत ओळख झालीच आहे. त्यानंतर ते कॉलेजमध्यें जुनीअर व सीनीअर फेलो होते, हेंही पण तुम्हांस विदितच आहे. त्यानंतर फेलोचें काम करीत असतांनाच माधवरावांच्याकडे इंदुप्रकाशाच्या इंग्रजी बाजूच्या संपादकाचें

काम आलें. त्या वेळीं ते तरुणच होते. तरी त्यांनीं आपल्या फेलोशिपचा व्याप संभाळून व अडचणी सोसूनही संपादकाचें काम फारच परिणाम होण्यासारखें केलें! त्यांनीं आपल्या लेखनशैलीनें सर्व प्रकारें लोकांवर छाप बसविली. त्यांचे स्वतंत्र विचार, विचारांचा सुंदरपणा, उच्च भाषासरणी, लिहिलेल्या विषयाची पूर्ण माहिती, विचारांचा भारदस्तपणा, उदारपणाचें धोरण, व स्वतःच्या कार्यक्षमतेविषयीं पूर्ण विश्वास. यामुळें इंदुप्रकाश वर्तमानपत्राचें महत्व त्यांनीं फारच वाढविलें !

त्यानंतर माधवरावांनीं वेळोवेळीं आपल्या आयुष्यक्रमांत, ॲक्टिंग मराठी ट्रॅन्स्लेटर, अक्कलकोटचे कारभारी, कोल्हापुरचे न्यायाधीश, हॉयकोर्टांत असिस्टंट रिपोर्टर, प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, प्रिन्सिपॉल सदर अमीन, फर्स्टक्लास फर्स्टग्रेड सबजज्ज, पुण्याच्या स्मॉलकॉज कोर्टाचे जज्ज, शेतकऱ्यांच्या कामाबद्दलचे स्पेशल जज्ज, फायनॅन्स कमेटीचे कमिशनर, व अखेरीला मृत्युपूर्वीं सहा वर्षें हायकोर्टांतील जज्ज अशा प्रकारें निरनिराळीं कामें बजावलीं होतीं.

बाळांनो, माधवरावांच्याप्रमाणें थोर मोठे गुण अंगीं आणून माधवरावांसारखें आपणही थोर पुरुष व्हावें असें नाहीं कां तुम्हांला वाटत ! तर मग त्यांच्या गुणांचा नीट अभ्यास करा. ते गुण आपल्या ठिकाणीं आणण्याचा यत्न करा पाहूं !

---



# प्रकरण १२ वें,

## न्यायमूर्तींच्या आसनावर

माधवरावांची नेमणूक सन १८९३ च्या नोव्हेंबर महिन्यांत मुंबई हायकोर्टाच्या न्यायमूर्तींच्या जागेवर झाली. हायकोर्टाच्या पवित्र आणि थोर आसनावर शोभणारे माधवरावजी हे पहिलेच हिंदी गृहस्थ असल्यानें हा समारंभ पाहण्याकरितां मुंबईचे लहानथोर लोक मोठ्या कौतुकानें हजर राहिले होते ! माधवरावजींची योग्यता न्यायमूर्ति या दृष्टीनें इतकी होती, व तिचा आरंभ इतक्या लौकर झाला कीं, सबजज्जाच्या जागेवर असतांना त्यांनीं दिलेले निकाल हायकोर्टांतील गुणी म्हणविणाऱ्या थोर थोर न्यायमूर्तींना आश्चर्यानें थक्क करून टाकण्यासारखेच होते !

इतर न्यायमूर्ति अपीलाच्या खटल्याचे कागद सगळे न पहातांच दाखल करून घेत असत. परंतु माधवरावांची न्याय देण्याबद्दलची थोर बुद्धि असामान्य होती. त्यामुळें सर्व कागद पूर्णपणें वाचल्याशिवाय ते काम दाखल करून घेत नसत. त्यामुळें 'कामाचा व्याप वाढला. परंतु माधवरावांनीं आपल्या हातून अन्याय होऊं नये म्हणून तो आनंदानें पतकरला. माधवरावांना या जागेवर असतांना शेकडों निकाल करावे लागले; परंतु त्यांनीं सांगोपांग विचार केल्याशिवाय एकही निकाल केला नाहीं. ते न्याय देतांना जातीचा अगर गोताचा विचार करीत नसत व पक्षपातीपणाचा विचारही मध्यें येऊं देत नसत.

फौजदारी गुन्ह्यांच्या बाबतीमध्यें खुनाच्या खटल्याचे निकाल देतांना आपल्या हातून निरपराधी लोकांचे बळी दिले जाऊं नयेत म्हणून ते तासचे तास खटल्याचे कागद वाचण्यांत व मनन करण्यांत

घालवीत असत. व त्यांत त्यांनीं शेवटीं आपली प्रकृति अधिक बिघडवून घेतली! दर शनिवारीं कज्याच्या बाबतींत कायदा पाहण्याकरितां गाडाभर पुस्तकें घरीं आणून वाचीत व सर्व तयारी करीत. यामुळें त्यांच्यापुढें काम चालवितांना वकीलांची फारच धांदल उडत असे! माधवराव केव्हां काय प्रश्न विचारतील याचा नियम नव्हता. त्यामुळें वकिलांनाही खटल्याची पूर्ण कसून तयारी करावी लागे! खटल्याचे कागद पूर्वींच वाचल्यानें माधवरावांचें स्वतःचें एक मत बनत असे. पण तेंच कायम ठेवण्याबद्दल त्यांनीं कधीं दुराग्रह चालविला नाहीं. वकीलांनीं त्यांचें मत खोडून काढण्याचा प्रयत्न केल्यास व योग्य आधार दाखविल्यास ते आपलें मत बदलण्यास सदैव तयार असत. त्यांच्या बुद्धीची तीव्रता अशी होती कीं, जितका एकादा खटला अवघड व गुंतागुंतीचा, तितकी माधवरावांची बुद्धिमत्ता अधिक प्रमाणांत प्रगट होत असे. व बिकट प्रश्न अगदीं नेमका बिनचूक ते सोडवीत असत! माधवरावांविषयीं बहुतेक सर्व जज्जांनीं, त्यांच्या विद्वत्तेचे, परिश्रमाचे, व सौजन्याचे गोडवे गाइले आहेत. अडचणीचा प्रश्न आला कीं, त्यांतून समाधानकारक सोडवणूक करणारा माधवरावांसारखा सल्लागार मिळावयाचा नाहीं, अशी प्रत्येकाची भावना झाली होती. माधवरावांच्या बरोबर पार्सन्स नांवाचे युरोपियन न्यायाधीश होते. टाइम्स नांवाच्या वर्तमानपत्रानें असें लिहिलें आहे कीं, पार्सन्स स्वतः अतिशय विद्वान, माहीतगार, व अनुभवी असतांही त्यांना कायद्यांत अडणारे प्रश्न माधवराव सहज सोडवीत!

माधवराव न्यायाधीशाचें काम करीत असतांना त्यांना बडोदा संस्थानामध्यें सन १८९६ सालीं दिवाणाचे जागेवर बहुमानानें बोलावणें आलें होतें. तसेंच कोल्हापूर व इंदूर एथील राजांनींही त्यांना

आपल्या संस्थानांत बहुमानानें बोलाविलें होतें. पण माधवरावांनीं संस्थानांत आपला स्वतंत्र बाणा, स्पष्टोक्ति, निःपक्षपातीपणा, स्वार्थत्याग या गुणांचें मातेरें होईल, याकरितां त्या जागा नाकारिल्या !

बालकांनो, तुम्हांला माधवरावांचें चित्र डोळ्यापुढें ठेवून आपल्या आयुष्याला नमुनेदार वळण लावितां येणार नाहीं काय ! मोठेपणा प्राप्त करून घेऊन स्वतःचें कल्याण साधतां येणार नाहीं काय ! येईल, खास येईल ! पण माधवरावांचे गुण अंगीं आणण्याचा जीवांभावानें यत्न करा. त्याप्रमाणें आचरण करा, ह्मणजे तुम्हीही थोर व्हाल !

---

# प्रकरण १३ वें.

## लोकहिताची कामगिरी.

बालबंधूंनो, कोणत्याही मनुष्याची योग्यता त्याचा विचार, आचार व कृति यांवरून ठरत असते. मनुष्याचे कांहीं विचार, आचार व कृति त्याच्या केवळ घरापुरत्या, त्याच्या स्वतःपुरत्या, त्याच्या कुटुंबांतील मंडळीपुरत्या असतात. त्याबाबत तो अगदीं स्वतंत्र असूं शकतो. परंतु घराबाहेरील त्याचे विचार, आचार व कार्य यांना, लोकांशीं संबंध आल्यामुळें एक प्रकारचें बंधन पडत असतें तसेंच नोकरी अगर दुसऱ्याची ताबेदारी असेल तरीही पण मनुष्याला एक प्रकारचें बंधन असतेंच. त्या बंधनामुळें कांहीं गोष्टी त्याला ठरावीक पद्धतीनेंच कराव्या लागतात. आतां, एखाद्या मनुष्याची योग्यता, त्याच्या लोकांशीं आलेल्या संबंधामुळें अगर नोकरीपेशामुळें जर कांहीं चांगल्या गोष्टी त्याला कराव्या लागल्या किंवा त्या बंधनामुळें त्याच्या हातून घडल्या, तर तेवढ्यावरून ठरवितां येणार नाहीं. तर

त्यानें जे आचार, विचार व कृति केवळ लोकांच्या हिताच्या दृष्टीनें, स्वतःच्या इच्छेनें, कोणीं न सांगतां, स्वतःचा नफातोटा न पाहतां पत-करल्या असतील, ते विचार, आचार व कृति यांनुळेंच त्याची खरी योग्यता कळून येणारी असते. याला उदाहरणच घ्यावयाचें तर असें घेऊं कीं, एका मनुष्याला सार्वजनिक विहिरी, तलाव, धर्म-शाळा, सडका बांधणें व दुरुस्त करणें हीं कामें लोकलबोर्डाकडून पगार घेऊन, पगारी नोकर म्हणून करावीं लागतात; व दुसरा एक मनुष्य गांवोगांव हिंडून कांहीं स्वतःचे पैसे व कांहीं देणग्या वगैरे मिळवून केवळ लोकांच्या कल्याणाकरितां परोपकारबुद्धीनें विहिरी, तलाव, धर्मशाळा, सडका, बांधीत आहे, व स्वतः अत्यंत कष्ट सोसून, स्वतःचा पैसा खर्चून ही कामगिरी करीत आहे! वरील दोन्ही मनुष्यांच्या हातून होणारीं कार्यें पाहिलीं तर एकाच प्रकारचीं आहेत. परंतु एक पैशाकरितां, नोकरीचें बंधन म्हणून करीत आहे, व दुसरा आपल्या आवडीनें लोककल्याणाकरितां स्वतः होऊन करीत आहे; यावरून पहिल्यापेक्षां दुसऱ्याच्या कामगिरीची व थोरवीची योग्यता अधिक नाहीं काय!

आपल्या चरित्रनायकाची—माधवरावांची गोष्ट अशीच होती. माधवरावांच्या मागें नोकरीचा व्याप किती प्रकारचा होता व त्यांचा एकंदर व्यासंग किती जबर होता हें तुम्हीं पूर्वीं वाचलेंच आहे. केवळ नोकरींत असतांना सरकारनें त्यांच्यावर लादलेली कामगिरी म्हणून त्यांनीं कामें केलीं आहेत तींसुद्धां अतिशय उत्तम प्रकारचीं व त्यांची थोरवी वाढविणारीं अशींच आहेत. परंतु त्याहींपेक्षा त्यांनीं नोकरीचीं सर्व बंधनें संभाळून, नोकरीचा त्रास व सर्व जबाबदाऱ्या पार पाडून, शिवाय केवळ स्वतःच्या मनाची तळमळ म्हणून, आपले आजूबाजूचे देशबंधु,

आपले भाऊबंद, आपला हिंदुस्थान देश, यांच्या वाईट स्थितीची, अज्ञान दशेची व सर्व बाजूंनीं होत गेलेल्या अवनतीची जाणीव उत्पन्न झाल्यामुळें, अगदीं निरपेक्ष बुद्धीनें, स्वतःचा कोणताही फायदा नसतांना, उलटा त्रासच सोसून, जीं सार्वजनिक, लोकांच्या व देशाच्या हिताचीं कामें केलीं आहेत, त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे, माधवराव हे खरोखरीच उच्च कोटींतील महात्मे होते, साधुपुरुष होते, व त्यांचा जन्म केवळ लोकांच्या कल्याणाकरितांच झाला होता व आपल्या या जन्मभूमीचें व हिंदु लोकांचें भाग्य म्हणूनच ते या वेळीं हिंदुस्थानांत जन्माला आले, असेंच ह्मणावें लागतें! व त्याबद्दल आपण परमेश्वराचे खरोखरी आभारच मानले पाहिजेत असें मनाला वाटूं लागतें.

बाळांनो, तुम्ही जरी लहान असलां, तरी तुम्हांला सुद्धां आपल्या स्वतःच्या आवडीनें, केवळ दुसऱ्यावर उपकार करण्याच्या बुद्धीनें किती तरी गोष्टी करितां येण्यासारख्या नाहींत काय? निदान घरांतल्या घरांत तरी करितां येणार नाहींत काय? आपलें स्वतःचें रोजचें सर्व कर्तव्य—लौकर निजणें, लौकर उठणें, उत्तम प्रकारची स्वच्छता ठेवणें, कपडे नीटनेटके ठेवणें व वापरणें, वेळच्या वेळीं शाळेस जाणें वगैरे गोष्टी योग्य प्रकारें संभाळूनही वडील माणसांच्या, आपल्या भावंडांच्या, आपल्या गुरुजनांच्या उपयोगी पडण्याचा प्रयत्न, त्यांनीं न सांगतां आपण होऊन तुम्ही करणें, किती थोरपणाचें व आनंददायक होईल बरें? तसेंच घराच्या बाहेरचा विचार करणें झालें तरी, तुम्ही आपल्या शेजाऱ्यांच्या, किंवा इतर दीनदुबळ्या माणसांच्या उपयोगी, केवळ स्वतःच्या बुद्धीनें पडूं लागाल, त्यांना अनेक प्रकारें जरूर ती मदत, कोणीही न सांगतां करूं लागाल, आपल्या शाळेंतील इतर सोबत्यांच्या बाबतींतही हीच परोपकाराची, बंधुभावाची जाणीव

ठेवून वागत जाल; तर तुमच्या ठिकाणीं बालवयांतच एक प्रकारची लोकांच्या कल्याणाची व त्याबरोबरच आपल्या देशाची सेवा करण्याची आवड व थोर बुद्धि उत्पन्न होऊन राहणार नाहीं काय ? आणि या अशाच प्रकारच्या बालबुद्धीचा नेहमीं नेहमीं चांगला उपयोग केल्याच्या योगानें थोरपणीं न्यायमूर्ति रानडे, अगर त्यांच्याच तोडीचे इतर थोर पुरुष यांच्या बरोबरीनें तुम्हांसही मोठेपणा मिळवून शिवाय स्वतःची उत्तम प्रकारची उन्नति करून घेतां येणार नाहीं काय ? तर मग प्रिय वाचकांनो, तुम्ही आतांपर्यंत जर अशा प्रकारची मनाची तयारी केली नसेल, तर आजपासूनच, आपल्या वडील माणसांच्या, आपल्या भावंडांच्या, आपल्या शाळेंतील सोबत्यांच्या, आपल्या गुरुजनांच्या, आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या उपयोगी पडण्याची एकही संधी शक्य तोंवर वाया न जाऊं देण्याचा निश्चय करा, व त्याप्रमाणें वागण्यास सुरवात करा ! म्हणजे दिवसेंदिवस, आपण मनाचे थोर होत आहोंत, आपला आनंद शतपटीनें वाढत आहे, असा तुम्हांला अनुभव येऊं लागेल, आणि तुम्हीही न्यायमूर्तीप्रमाणें थोर होऊन आपली कीर्ति अजरामर करूं शकाल यांत मुळींच शंका नाहीं !

---

# प्रकरण १४ वें.

## माधवरावांचें धर्माचरण.

माधवरावांनीं स्वतःच्या आवडीनें जीं लोककल्याणाचीं कामें केलीं, तीं चार प्रकारचीं होतीं. धर्माचीं, देशांतील सर्व प्रकारच्या लोकांचीं, समाजाचीं, उद्योगधंद्याचीं, व राजा व प्रजा यांच्यामधील हितसंबंधाची उन्नति व त्याबद्दलचे प्रश्न कसे सोडवितां येतील, याबद्दलची कामगिरी

माधवरावांनीं आपलें शक्तिसर्वस्व खर्चून केली. त्यापैकीं प्रथम धर्माची उन्नति साधण्याबद्दल माधवरावांनीं काय काय प्रयत्न केले, त्याबद्दलचा विचार या प्रकरणांत करावयाचा आहे.

बालवाचकांनो! धर्म याचा अर्थ अगदीं सोपा आहे. आपल्या स्वतःविषयीं, आपल्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांविषयीं, समाजाविषयीं, आपल्या देशाविषयीं व शेवटीं परमेश्वराविषयीं, जें योग्य व थोर कर्तव्यकर्म—करावयाचें वर्तन, आचारविचार, व जें सर्व लोकांना एकमतानें पटण्यासारखें असेल,— त्या कर्तव्यकर्माला 'धर्म' असें थोडक्यांत म्हणतां येईल. आतां अशा प्रकारचें कर्तव्यकर्म केल्याशिवाय आपली उन्नति होणार नाहीं, आपणांस सुख व समाधान मिळणार नाहीं, हेंही खरें आहे. म्हणूनच कर्तव्य केल्याशिवाय म्हणजेच धर्म पाळल्याशिवाय, धर्मप्रमाणें आचरण केल्याशिवाय आपल्याला स्वतःचें सुख, समाधान व उन्नति साधतां येणार नाहीं.

आतां, धर्म म्हणजे काय याची साधारण कल्पना तुम्हांला आलीच असेल. परंतु एक गोष्ट थोडी कठीण वाटेल. ती गोष्ट म्हणजे—'परमेश्वर म्हणजे काय? व त्याच्याबद्दलचें आपलें कर्तव्य काय?' बाळांनो, आपल्या नेहमींच्या पाहण्यांत किती तरी गोष्टी आपल्यास कळण्यास कठीण व अद्भुत आहेत त्यांचें उत्तर आपणांस देतां येत नाहीं. उदाहरणार्थ—आपण आपल्या भोंवतीं आकाश, चंद्र, सूर्य, तारे, पृथ्वी, झाडें, पर्वत, नद्या, ओढे, पशु, पक्षी, मनुष्यें, जमिनीच्या पोटांत व जमिनीच्या वर असणाऱ्या नानाप्रकारच्या वस्तु नेहमीं पाहतों; त्या कोणीं उत्पन्न केल्या? याचें उत्तर आपणांस देतां येत नाहीं. त्या वेळीं या असंख्य वस्तु निर्माण करणारा कोणी तरी जगाचा पालक, जगावर सत्ता चालविणारा, सर्व विश्वाला संभाळणारा, कोणी-

तरी निराळाच असला पाहिजे, हें खास; असें मनाला वाटूं लागतें व पटूं लागतें; त्यालाच आपण 'देव देव' असें म्हणतों, 'परमेश्वर' असें म्हणतों व त्याची प्रार्थना करीत असतों. तसेंच चंद्र, सूर्य, पृथ्वी, तारे हीं सर्व कोणताही आधार नसतांना अंतराळीं आकाशामध्यें कशीं फिरत राहतात? झाडें, फुलें, फळें व सर्व प्रकारचे प्राणी यांचें जन्माला येणें, पोषण होणें व अंत होणें; या सर्व गोष्टींची तजवीज कोण करीत असतें? त्यांना बुद्धि, मन, हालचाल करण्याची शक्ति, जीव हीं कोण घालतो? या सर्व गोष्टींचा आपण विचार करूं लागलों, तर आपणाला—या सर्व गोष्टी घडवून आणणारी कोणी तरी एक थोर, अज्ञात शक्ति, जगाच्या बाहेरची, निराळीच असली पाहिजे असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. व त्याच शक्तीला आपल्या पूर्वापार ऋषींनीं—पूर्वजांनीं देव, परमेश्वर, असें नांव दिलें आहे. त्यावरून परमेश्वर म्हणजे काय, याची कल्पना थोडी तरी तुम्हांला आल्याशिवाय राहणार नाहीं.

तेव्हां अशा प्रकारच्या परमेश्वराची आपण नित्य मनामध्यें अगर अन्य तऱ्हेनें, त्याची एकादी मूर्ति कल्पून अगर करून, पूजा करणें, त्याची प्रार्थना करणें, 'देवा! माझा चांगल्या प्रकारें संभाळ कर! मजवर दया कर! तूं सर्व चांगल्या गुणांचा सांठा आहेस, तरी तुझ्या कृपेनें त्या सर्व गुणांचा उदय मजमध्यें होऊं दे!' वगैरे परमेश्वराच्या स्तुतीच्या व प्रार्थनेच्या प्रकाराला परमेश्वराबद्दलचें आपलें कर्तव्य असें म्हणतां येईल. याशिवाय कांहीं लोक जगामध्यें जें जें म्हणून चांगलें आहे, त्या सर्वालाच देव असें म्हणून त्याची पूजाअर्चा, आराधना करीत असतात. पृथ्वी, सूर्य, चंद्र, नद्या, तुलसीवृक्ष, औदुंबर वृक्ष, पिंपळ, गाय, घोडा, नाग वगैरेसारख्या प्रत्यक्ष दिसणाऱ्या वस्तूंचीही पूजा

करून त्यांनाही देव मानणारे पुष्कळ लोक आहेत. तेव्हां या सर्व प्रकारच्या कृति थोड्या फार प्रमाणांत आपल्या धार्मिक आचरणांतच मोडतील असें म्हटल्यास चालेल.

आतां वर लिहिलेल्या धर्माच्या, कर्तव्यकर्माच्यासंबंधीं माधवरावांची वागणूक कशी होती, ते स्वतः कसे वागत होते हें पाहूं या.

साधरणपणें मनुष्याला मोठेपणा, श्रीमंती, अधिकार व ज्ञान मोठ्या प्रमाणांत लाभलें, म्हणजे त्याच्या ठिकाणीं अहंभाव, मीपणा वाढूं लागतो. मग मी काय तो शहाणा ! आपल्याला कोणाची पर्वा नाहीं, कोठला देव? कोठचा धर्म? नाहीं ती कटकट ! असें वाटावयास लागतें. परंतु माधवरावांचें तसें मुळींच नव्हतें. त्यांची धर्मावर व ईश्वरावर फार श्रद्धा होती. माधवरावांचें मत असें होतें कीं, एकाद्या मनुष्याच्या अगर देशाच्या खऱ्या उन्नतीला धार्मिक, शारीरिक, मानसिक व बौद्धिक शुद्धाचरण व परमेश्वराबद्दलच्या पूज्य भावाची अतिशय जरूरी असते. सर्व थोरपणाच्या मुळाशीं शुद्ध धर्माचरणानें मिळणारें मनाचें बल आणि धर्माबद्दलच्या श्रद्धेनें मिळणारा आत्मविश्वास, मनोधैर्य पाहिजे ही गोष्ट प्रत्येक लहानथोर व्यक्तीनें आपल्या दृष्टीपुढें सदैव वागविली पाहिजे.

धर्माचरण चांगलें व्हावें; धर्माची, परमेश्वराची चांगली ओळख व्हावी, म्हणून त्याबाबतचे सर्व ग्रंथ व साधुलोकांचीं चरित्रें, तुकाराम. रामदास वगैरेंचे प्रासादिक ग्रंथ, तसेंच भगवद्गीता, महाभारत, भागवत, रामायण, उपनिषदें वगैरे सर्व धार्मिक ग्रंथ यांचें वाचन त्यांनीं नित्य ठेविलें होतें. या विषयावर त्यांचा सतत अभ्यास, चिंतन, मनन सुरू असे व त्यावरून त्यांनीं आपल्या आध्यात्मिक उन्नतीकरितां निष्कर्ष म्हणून प्रेमळ भक्तिमार्ग—परमेश्वराचें नेहमीं मोठ्या आनंदानें, खुल्या

मनीनें, आणि श्रध्देनें भजन करणें आणि तें करितांना सर्व जगाला, स्वतःला विसरून जाऊन त्यांतच तल्लीन होऊन जाण्याइतकी मनाची तयारी करणें—हाच मार्ग पसंत केला होता. त्याकरितां त्यांनीं स्वतःच्या व सर्व लोकांच्या उपयोगाकरितां प्रार्थनासमाज या नांवाची एक संस्था स्थापन केली होती.

माधवरावांच्या वेळीं तरुण सुशिक्षित पिढी धर्माविषयीं व परमेश्वराविषयीं बेफिकीर व श्रध्दाहीन बनत चालली होती. त्यांना माधवरावांनीं धर्मांतील चांगलीं चांगलीं थोर आणि उदात्त तत्वें व त्या तत्वांप्रमाणें वागण्यापासून होणारा खरा आनंद व खरें समाधान यांची ओळख पटवून दिली; व त्यांना सन्मार्गावर आणलें. तसेंच जीं जुन्या विचाराचीं म्हातारीं माणसें होतीं, तीं खऱ्या धर्माच्या नियमांचा, तत्वांचा विचार न करितां गैरसमजानें व आंधळेपणानें धर्माच्या नांवाखालीं भलत्याच भोळेपणानें वागून स्वतःचें नुकसान करून घेत होतीं. त्यांनाही माधवरावांनीं आंधळेपणानें न वागतां खऱ्या धर्मतत्वांचा, नियमांचा अर्थ पाहून परमेश्वराबद्दलचें योग्य ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीनें वागून आपली उन्नति कशी करितां येईल हें दाखवून दिलें, व त्यांनींही त्याप्रमाणें आपली उन्नति करण्याचा यत्न केला. येणेंप्रमाणें जुन्या व नव्या मतांच्या लोकांना एकत्र आणून विचार करण्याकरितां व सुधारणा करण्याकरितां माधवरावांनीं वर सांगितलेली "प्रार्थनासमाज" या नांवाची संस्था काढली, व ती अद्यापि सुस्थितींत आहे.

आणखी एक गोष्ट माधवरावांनीं सर्वांच्या अत्यंत फायद्याची केली. ती म्हणजे त्यांनीं सर्वांना खऱ्या धर्मतत्वांची ओळख करून दिली; त्याप्रमाणें वागलें असतां होणारा फायदा व समाधान दाखवून

दिलें. त्यामुळें धर्माबद्दल व धर्माचरणाबद्दल एक प्रकारचें उत्कट प्रेम व आदर माधवरावांनीं सर्वांमध्यें वाढाविला. आपल्या धर्माप्रमाणें उघडपणें आचरण करावें, ह्यांत कोणी कोणाची लाज अगर भीड धरण्याचें कारण नाहीं, असेंही त्यांनीं स्वतःच्या आचरणानें सर्व लोकांस पटवून दिलें.

माधवरावांच्या ठिकाणीं आपल्या धर्माबद्दल अतिशय आदर होता. त्यांचा परमेश्वरावर अढळ विश्वास होता. तो दाखविण्यास माधवराव कधींही लाजले नाहींत. सर्वांदेखत, कोणत्याही ठिकाणीं व कोणत्याही स्थितींत परमेश्वराला नमस्कार करणें, त्याची मोठ्यानें प्रार्थना करणें, याबद्दल त्यांची वृत्ति नेहमीं खुली असे. ते नेहमीं देवाच्या चिंतनांत काळ घालविण्याचा यत्न करीत आणि देवाची जाणीव ठेवून वागत असत, आपल्या अंतःकरणाचें सुखदुःख मोठ्या प्रेमळपणानें आणि भक्तीनें प्रार्थना करून, देवाला आपला मित्र म्हणून सांगण्यांत, त्याची करुणा भाकण्यांत माधवरावांना फार आनंद व मोकळेपणा वाटत असे. सकाळच्या आनंददायक वेळेला माधवराव तुकारामाचे अभंग घोळून घोळून प्रेमानें अंतःकरण भरून येऊन म्हणत ! त्या वेळीं त्यांचा तो भाव, त्यांचा तो प्रेमळपणा, त्यांच्या अंतःकरणाची गोड स्फूर्ति व तुकारामबुवांप्रमाणें परमेश्वराच्या भजनांत स्वतःला विसरून जाऊन तल्लीन होण्याची पद्धत हीं पाहिलीं असतां पाहणारे व ऐकणारे आनंदानें व भक्तिरसानें डोलूं लागत, आणि माधवराव हे खरोखरी कोणी तरी उच्च कोटींतले साधुपुरुष असावेत असेंच सर्वांना वाटल्याशिवाय रहात नसे !

बालवाचकांनो, माधवरावांच्या धर्माबाबतच्या विचारांचें, आचारांचें चित्र तुम्हीं आपल्यापुढें ठेवून वागल्यास, तुमची सर्व प्रकारें

उन्नति होऊन तुमच्या मनास दैवी आनंद व समाधान झाल्याशिवाय राहणार नाहीं. याचा अनुभव तुम्ही आजपासूनच घेण्यास सुरवात करा ! प्रातःस्नान, संध्या, अगर ज्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें परमेश्वराची आराधना, सूर्यास नमस्कार अगर अन्य व्यायाम, देवाची पूजा, आरती, प्रार्थना, आणि ज्याच्या त्याच्या धार्मिक पुस्तकाचें थोडेसें वाचन, अभ्यास, मनन याप्रमाणें नित्य नियमानें आपलें आचरण ठेवाल, तर तुमचें मन, अंतःकरण, आचारविचार, सर्व जीवनक्रम, अत्यंत शुद्ध, पवित्र व उदात्त होत जाईल; मग तुम्हांला धर्माचरणाचा, देवतांच्या भक्तीचा सात्विक आनंद कसा असतो, याचा खरा अनुभव येऊं लागेल. बाळांनो, उठा; आजच अशा प्रकारच्या आचरणास आरंभ करा पाहूं !

---

## प्रकरण १५ वें,

### सामाजिक कार्य.

माधवरावांची सामाजिक कामगिरी पाहूं लागल्यास सर्व: देशाच्या सामाजिक परिस्थितीबद्दलचा सर्व इतिहासच द्यावा लागेल. आणि त्याची बालवाचकांनो ! तुम्हांस आताच जरूरी नाहीं. फक्त त्यांच्या ठिकाणीं सामाजिक कार्याबद्दलचे जे गुण दिसून आले होते, त्यांचाबतच आपणांस लक्षांत ठेवण्यासारख्या किती गोष्टी आहेत तेवढेंच आपण पाहूं म्हणजे झालें.

माधवरावांनीं त्यांच्या वेळच्या समाजाची जरूर ती सुधारणा घडवून आणण्याकरितां ‘ सामाजिक परिषद् ’ या नांवाची संस्था स्थापन केली होती. व तिच्या द्वारें निरनिराळीं प्रकारचीं व्याख्यानें करवून

व सर्व जनतेला एकत्र आणून, त्यांना नवीन विचारांचें वळण देऊन सर्व प्रकारच्या सुधारणा घडवून आणण्याचा यत्न माधवराव करीत असत. त्याबाबत कधीं निराशही न होणें हा माधवरावांचा अत्यंत महत्त्वाचा गुण होता. कोणाही व्यक्तीला आपल्या नेहमींच्या संवयी सोडून निराळ्या संवयी लावून घेणें किती अवघड वाटतें, व तो त्याबद्दल किती नाखूष असतो, याचा अनुभव सर्वांना आहेच. त्यामुळें सामाजिक सुधारणा करितांना, आपल्या पूर्वींच्या सामाजिक संवयी, आचाराच्या पद्धति, कितीही गैर असल्या, तरी केवळ पूर्वापार आपल्या म्हणूनच आपल्याला प्रिय वाटतात, त्या सोडून देण्याचा उपदेश एखाद्यानें केल्यास, त्याच्या विरुद्ध लोक कसे उलटतात व त्याची किती निराशा करितात, हें सर्वांना परिचित आहेच. परंतु माधवरावांच्या मनानें सामाजिक सुधारणा घडवून आणणें अत्यंत जरूर आहे व ती योग्य त्या मार्गांनीं घडवून आणलीच पाहिजे, असें एकदां ठरवून टाकलें; व त्यानंतर कितीही निराशेचे प्रसंग आले, कितीहि विरोध झाला, तरी त्यांस न जुमानतां आपल्या सुधारणा घडवून आणण्याचा त्यांनीं यत्न केला व त्या घडवूनही आणल्या!

सार्वजनिक सामाजिक कार्य करणाऱ्या मनुष्याला किती तरी प्रकारच्या भिन्न स्वभावाच्या व लहरीच्या माणसांबरोबर वागण्याचे व त्यांचा उपयोग करून घेण्याचे प्रसंग येत असतात. या बाबतींत माधवरावांची माणसाची योग्य पारख करण्याची हातोटी फार चांगली होती. एखाद्या मनुष्याच्या ठिकाणीं कांहीं चांगले गुण आहेत, असें त्यांच्या दृष्टीस आलें, कीं त्याच्या अंगच्या इतर वऱ्यावाईट गुणानें अगर दुर्गुणानें गैरसमज वाढवून त्याला कुचकामी ठरवून त्याचा तिरस्कार न करितां त्याच्या केवळ गुणांचा उपयोग करून घेण्याचीच

दृष्टि माधवराव ठेवीत असत. दुर्गुणांना सुधारतां आलें तर सुधारून, निदान त्याबद्दल कानाडोळा करून, गुणांचाच तेवढा पुरस्कार करून एकाद्या माणसाचा खरा उपयोग करून घेण्यांत माधवरावांचा योजकपणा फार मार्मिक रीतीनें दिसून येत असे.

माधवरावांनीं सामाजिक परिषदेमार्फत पुनर्विवाह, जातिभेद, बालविवाह, मद्यपाननिषेध, स्त्रीशिक्षण वगैरेसारखीं कितीतरी समाजसुधारणेचीं कामें हातीं घेतलीं होतीं! त्यांनीं जर या सर्व चळवळीं-विषयीं ज्यांचें मत आपल्यासारखें होईल त्यांनाच तेवढें जवळ करावयाचें व बाकीच्या लोकांशीं कांहीं बाबतींत आपलें पटत नाहीं म्हणून त्यांना दूर ठेवावयाचें असें केलें असतें, तर प्रत्येक व्यक्ती-पासून ज्याचा जेवढा असेल तेवढा गुण मिळून "थेंबें थेंबें तळें साचे" या न्यायानें जीं चांगलीं कार्यें घडून येतात, तीं त्यांना करून दाखवितां आलीं नसतीं आणि सर्व लोकांचें व राष्ट्रांचें एकीकरण करितां आलें नसतें; आणि सामाजिक परिषदेमार्फत सामाजिक सुधारणा घडवून आणण्यामध्यें त्यांना आलें तितकें यशही आलें नसतें.

वृद्ध, तरुण, होतकरू व अनुभवी मंडळी जमवून एकमेकांचे विचार एकमेकांना समजून यावे, आणि परस्परांचा फायदा व्हावा, याबद्दल माधवरावांना विलक्षण हौस होती. माधवरावांच्या पूर्वीं पुण्यास "हिंदू क्लब" या नांवाची एक संस्था चालू होती, परंतु ती लौकरच मोडली आणि माधवरावांनीं पुढें नव्या नव्या अनेक संस्था स्थापन केल्या. वाचनगृहें, प्रदर्शनें, व्याख्यानमाला, मोठ्या प्रमाणांत राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद इत्यादि संस्था काढण्याचा मुख्य हेतु निरनिराळ्या विचारांचीं कर्तीं माणसें एकत्र आणून त्यांच्यांत सहकारिता व मैत्री उत्पन्न करावी, व याच प्रकारें त्यांच्यांत

संघशक्ति, एकजुटीनें येणारें सामर्थ्य निर्माण करावें हाच होता. कोणताही कर्ता पुरुष आपल्या नेहमीच्या व्यवसायाच्या मर्यादा सोडून बाहेर इतर माणसांमध्यें व कार्यांमध्यें मिसळूं लागल्याशिवाय त्याच्या स्वभावांतले दोष जाणार नाहींत;—त्याच्या दृष्टीचा, मताचा विस्तार होणार नाहीं. "कूपमंडूक-वृत्ति—आहे हीच स्थिति चांगली, असें मानण्याची इच्छा—" बळावत जाईल हें उघड आहे. अशा प्रकारच्या वृत्तींचीं माणसें वाढत गेलीं म्हणजे कोणत्याही व्यक्तीचें, समाजाचें, राष्ट्राचें नुकसानच होत जातें. आणि म्हणूनच माधवरावांनीं त्या वेळच्या परिस्थितीचा सर्व विचार करून सर्व समाजाला सुधारण्याचा प्रयत्न चांगल्या तऱ्हेनें यशस्वी करून दाखविला.

बालबंधूंनो, तुम्ही सुद्धां आतां नुकते जगाच्या कार्यक्षेत्रामध्यें उडी घेत आहांत. त्यामुळें तुमचा संबंध शाळेमध्यें, घरींदारीं, बाहेर, आपल्यापेक्षां कितीतरी लहान, आपल्या बरोबरीच्या व कांहीं वेळेला मोठ्याही व्यक्तींशीं येणारच. तेव्हां तुम्हांलाही आंतापासूनच, आपले जितके अधिक मित्र करितां येतील जितक्या लोकांचा तुम्हांला अधिक उपयोग करून घेतां येईल; व तो करून घेण्यास तुम्हीं शिकलें पाहिजे. सर्वांनीं तुमच्याप्रमाणें वागलें पाहिजे अगर तुमच्याचसारखा विचार केला पाहिजे, अगर सर्वांच्याच ठिकाणीं तुमच्याप्रमाणेंच गुण असले पाहिजेत, कोणीही दुर्गुणी असतां कामा नये असें म्हणून जगांत वागतांच येणार नाहीं. तर आपला या जगामध्यें ज्यांचा ज्यांचा संबंध येईल त्यांच्या ठिकाणच्या गुणांची व दुर्गुणांचीही आपण पूर्ण ओळख करून घेण्यास शिकलें पाहिजे. व गुणांचा उपयोग करून घेऊन त्या व्यक्तीचा आपण तेवढ्यापुरता गौरव केला पाहिजे व उपयोग करून घेतला पाहिजे दुर्गुण असतील ते शक्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८

तोंवर गोड शब्दांनीं सुधारण्याचा यत्न केला पाहिजे. नाहीं सुधारले तर तेवढ्या बाबतींत सोडून देऊन, त्या व्यक्तीला कायमचें न दुखवितां, आपलेंसें करून, मित्र करून ठेवलें पाहिजे. तरच आपल्याला आपल्या जीवनक्रमांत कांहीं तरी कार्य करून दाखवितां येईल,—आपली स्वतःची, समाजाची व देशाची उन्नति करितां येईल. हे पूर्ण लक्षांत ठेवून वागण्याचा निश्चय करा, यत्न करा; व या जगाच्या अवघड संग्रामांतून पार पडा, एवढेंच कळकळीचें सांगणें आहे!

---

## प्रकरण १६ वें,

### माधवराव व देशांतील उद्योगधंदे

बालवाचकांनो, तुम्ही सर्वजण भूगोलाचा अभ्यास रोज करीत आहांतच. आपण ज्या देशांत राहतों, तो हिंदुस्थान देशही तुमच्या परिचयाचा आहेच. या आपल्या देशामध्यें, सर्व प्रकारच्या वस्तु उत्पन्न होतात. कापूस, गूळ, हळद, तमाखू, मीठ, मिरची, गहू, तांदूळ वगैरे नानाप्रकारचीं धान्यें, सर्व प्रकारचीं फळें, फुलें, वृक्ष, वनस्पती, सर्व प्रकारचे मसाल्याचे पदार्थ, लोकर, रेशीम, कातडीं साधीं व कमावलेलीं, सर्व प्रकारचे रंग तयार करण्याकरितां वस्तु व वनस्पती, सोनें, रुपें, चांदी, लोखंड, दगडी कोळसा वगैरे अनेक प्रकारच्या उपयुक्त धातु, तसेंच नानाप्रकारचीं जमीनींत सांपडणारीं व अन्य पदार्थांपासून काढलीं जाणारीं तेलें अशा सर्व जगांत सांपडणाऱ्या व अत्यंत उपयोगी अशा वस्तु हिंदुस्थानांत देवाच्या दयेनें विपुल होतात व सांपडतात!

बाळांनो, पूर्वीं रजपूत राजे असतांना, मराठे राजे असतांना, अथवा मुसलमान राज्यकर्ते असल्या वेळीं, देशांत पिकणाऱ्या सर्व

वस्तूंचा उपयोग देशांतच केला जात होता व त्यांच्यापासून आपणांस लागणारें सुती, रेशमी आणि लोकरीचें कापड, रंग, साखर, तेलें, यांत्रिक सामान, कलाकौशल्याचे तयार पदार्थ वगैरे सर्व आपल्याच देशांत आपलेच लोक नाना प्रकारचे कष्ट सोसून तयार करीत; व त्या धंद्यावर आपल्या देशांतील लोकांना व परदेशांतील लोकांना पदार्थ विकून ते नफा मिळवीत असत. आपल्या देशांतील नाना प्रकारचे कारखानदार, त्यांस लागणाऱ्या सर्व वस्तु, आपल्याच देशांतील कच्च्या पदार्थांपासून आपल्याच लोकांकडून तयार करवून घेत. त्यामुळें आपल्या देशांतील लोकांना भरपूर काम मिळत असे, व कोणत्याही प्रकारच्या नित्योपयोगी मालाकरितां दुसऱ्या देशावर आपणांस अवलंबून रहावें लागत नसे.

पण पुढें कांहीं कारणानें परदेशाच्या व्यापाऱ्यांनीं आपल्या देशांत व्यापार सुरू केला व त्यांनीं नाना प्रकारच्या चांगल्या चांगल्या वस्तु, यांत्रिक सामान, कापडचोपड वगैरे आपल्या देशांतून हिंदुस्थानांत आणून अगदीं स्वस्त दरानें विकण्यास सुरवात केली. एक प्रकारचें दुर्दैव म्हणा अगर कांहींही समजा, पण त्याच वेळीं आपले लोक थोडे अशिक्षित व अजागळ बनत चालले होते. त्यांतच या परदेशाच्या व्यापाऱ्यांनीं मोहक वस्तु व स्वस्त दर यांनीं भारून टाकल्यामुळें आपले लोक आपलेपणाचा अभिमान विसरले व आपल्या देशांतील वस्तु घेण्याचें सोडून परदेशी वस्तु घेण्यांतच आनंद मानूं लागले; त्यामुळें आपल्या देशांतील कारागिरांचे धंदे बुडूं लागले व परदेशी व्यापाऱ्यांना चांगली संधि मिळूं लागली, व शेवटीं आपल्या या देशांतील सर्व स्वतंत्र धंदे बुडाले व आपण केवळ बाजारांत मिळणाऱ्या परदेशी वस्तु घेण्यांतच समाधान मानूं लागलों! त्यामुळें येथील

सर्व कारागीर लोक व त्यांचे मदतनीस मजूर उपाशीं मरूं लागले व त्यांच्या ठिकाणीं असलेली कारागिरीच्या धंद्याची माहिती नाहींशी झाली !

त्यानंतर स्वतंत्र कारखान्यापासून आपल्याच देशांतील लोकांना मिळणारी मजूरी व स्वतंत्र धंदेवाल्यांची कमाई हीं बुडत चालल्यामुळें पैशाकरितां साहजिकच सर्व लोकांना शेतांत जो कांहीं कच्चा माल तयार होईल तोच परदेशच्या लोकांना विकावा लागला; व त्याची जी कांहीं किंमत मिळेल, त्यांतच आपणांस राहण्याचा प्रसंग येऊं लागला; त्यामुळें आपण एक प्रकारें त्यांच्या धंद्याकरितां सर्व कच्चा माल पुरविणारे मक्तेदार बनूं लागलों व कंगाल बनत चाललों. शेवटीं शेवटीं, दुसऱ्या देशांतून माल आला नाहीं तर हरघडी उपाशी राहण्याइतके परावलंबी बनून गेलों !

याप्रमाणें आमच्या मूर्खपणानें आम्ही किती तरी पैसे गमावून बसलों. पण जर आपल्या देशांतील कच्चया मालाचा पक्का माल आपणच तयार केला, तर आपले कारखानदार स्वतंत्रपणें जगतात; त्यांत काम करणारे मजूर जगतात; धंद्याची कुशलता आपल्या लोकांना येऊन ती कायमची टिकून राहते. आपल्या देशांतील लोकांना आपलेच कारखानदार माल पुरवूं लागल्यामुळें दुसऱ्या देशावर आपणांस अवलंबून रहावें लागत नाहीं, आणि आपण दुसऱ्या देशाचा तयार माल घेत गेल्यानें जो आपला पैसा परदेशीं जात असतो तो न जातां, आपल्या देशांतील आपल्याच कारखानदारांना, व्यापाऱ्यांना तो मिळूं लागतो आणि आपले उद्योगधंदे वाढूं लागतात.

आतां माधवरावांच्या वेळेला काय स्थिति होती व माधवरावांनीं काय कामगिरी केली तें पाहू. माधवरावांनीं स्वदेशीचा पाया घातला ! माधवरावांनीं त्या वेळच्या उद्योगधंद्यांचें व लोकांच्या मनांचें वर्णन

खालीलप्रमाणें दिलें आहे:—

" साधारणतः आपण आगगाडींत बसून जातों, तारायंत्रांतून आपले निरोप धाडतों, विलायतेंतील यंत्रसामर्थ्यानें जे सर्व सोईचे व शोकाचे पदार्थ तयार होतात ते आपण आवडीनें भोगतों व या सुखांत आपण मग्न असतों. हा सर्व उत्साह आपण करितों व आपले डोळे दिपतात. त्या वेळीं उत्साहतेजाची पडछाया आपणांस दिसत नाहीं. म्हणून आपणांस यांतच सुख वाटतें. परंतु आपल्यासारख्या समृद्ध देशांतील लोकांची अशी स्थिति व्हावी कीं, त्यांच्या निर्वाहाचे, सोईचे व शोकाचे पदार्थ त्यांस तयार करितां येऊं नयेत, केवळ आयते तयार केलेले पदार्थ मागविण्याची मात्र अक्कल आपणांस असावी, ही मोठी खेदाची गोष्ट आहे, असें कोण ह्मणणार नाहीं? यामध्यें देशाचें सामर्थ्य वाढलें असें होत नाहीं. उलट दिवसेंदिवस आपण सर्व पुरुष बायका झालों आहोंत अथवा लहान मुलें झालों आहोंत! त्या अवस्थेंत जसें दुसऱ्यावर अवलंबून राहणें जरूर पडतें, तद्वतच सर्व देशांतील प्रजेची स्थिति होत आहे. ........" वगैरे वगैरे.

यावरून माधवरावांचे वेळीं आपल्या देशांतील लोक आपले स्वतंत्र धंदे सोडून परदेशी मालाला भुलून परतंत्र होऊन बसले होते असेंच दिसतें.

आपल्या हिंदुस्थान देशाची उद्योगधंद्याच्या दृष्टीनें जी अवनति झाली होती, त्यांतून मार्ग काढण्यास व्यापारी वर्ग व शेतकरीवर्ग यांचा कितपत उपयोग होतो, याबद्दल माधवरावांचें मत खालीलप्रमाणें होतें. साधारणपणें काम करणारी प्रजा शेतांत कष्ट करणाऱ्या प्रजेपेक्षां अधिक सधन, शहाणी, समजुतदार, एकजुटीनें वागणारी अशी असते. शहरच्या व खेडगांवच्या वस्तींत जो भेद दिसून येतो तो अंशतः याच–

संबंधानें उत्पन्न होतो, असें म्हटलें असतां चालेल. तांबट, सुतार, लोहार, रंगारी, कासार, गवंडी, कुंभार अशा जातीचे व क्रयविक्रय करणारे वाणी उदमी लोक वगैरे धंदेवाल्यांमध्यें शेतकुणबी लोकांपेक्षां स्वतंत्रता, सधनता, शहाणपणा अधिक नसतो असें कोण ह्मणेल ?"

"शेतकीच्या धंद्यांत पोट भरणारांचें सामर्थ्य परिमितीचें असतें; इतर धंदे करणाऱ्या लोकांचें सामर्थ्य अपरिमित असतें, असें ह्मटलें असतां चालेल. ज्या देशांत केवळ शेतकरी लोकांपेक्षां म्हणजे खेड्यांत राहाणारे अथवा खेडू लोकांपेक्षां नगरवासी लोकांची म्हणजे इतर कामधंदा करणारे उदमी व कारागीर लोकांची वस्ती जास्त असते, तोच देश खरा सुखी व सधन असा साधारण सिद्धांत आहे. शेतकरी लोकांवर जुलूम झाला असतां, त्यांची एकजूट होत नाहीं व त्या जुलमाचा बोभाटा होत नाहीं. इतर कामधंदा करणारे लोक बहुधा मोठ्या समुदायानें राहतात; यामुळें त्यांस फुरसत चांगली असते. यामुळें जुलमाचा जोर फार वेळ टिकत नाहीं. निदान बोभाटा तरी जास्त होतो."

माधवरावांनीं याप्रमाणें सर्व देशांतील व्यापाराची, त्याचप्रमाणें कच्चा माल तयार करणारे शेतकरी, त्यापासून पक्का माल तयार करणारे कारखानदार, व मजूर; तो आपल्या देशांत व परदेशांत खपविणारे, व्यापार करणारे उदमी लोक, या सर्वांची परिस्थिति ओळखली होती. परदेशच्या व्यापाराबरोबर टक्कर मारावयाची तर त्यांच्या अत्यंत सुधारलेल्या यंत्रसामर्थ्याबरोबर, आणि शिस्त व कौशल्य यांजबरोबर टक्कर मारणें होय. पण आपल्या देशांतील लोकांकडे पाहिल्यास अज्ञान व आळस आणि गैरशिस्तपणा; व केवळ माणसांच्या हाताच्या सामर्थ्यावर व थोड्याफार बुद्धीच्या कौशल्यावर आपल्या उद्योगधंद्यांना अवलंबून

राहावें लागत आहे. या सर्व परिस्थितींतून मार्ग काढण्याकरितां माधव-रावांनीं "औद्योगिक परिषद" स्थापन केली व तिच्याद्वारें सर्व जनते-मध्यें जागृति केली! आपल्या देशांतून परदेशच्या खड्यांत जाणारें खंडोगणती द्रव्य, तसेंच आपल्या लोकांमधून कारागिरी व कौशल्यबुद्धि, कर्तबगारी, या महत्त्वाच्या गोष्टी नाहींतशा होत आहेत त्याला आळा घालण्याकरितां त्यांनीं स्वदेशी व्रताचा पुरस्कार केला! स्वदेशी व्रतानें हिंदुस्थानांतील कोणत्याही मनुष्याला जो कांहीं माल आपल्या स्वतःकरितां नेहमीं उपयोगीं पडणारा लागेल, तो सर्व त्यानें हिंदुस्थानच्या कच्च्या मालानें, हिंदुस्थानांतील भांडवलानें, हिंदुस्थानांतील कारखानदारांनीं, हिंदुस्थानांतील मजुरांकडून तयार झाला असेल, तरच घ्यावयाचा. कोणत्याही कारणानें परदेशांत तयार झालेला माल घ्यावयाचा नाहीं. मग तो स्वदेशी माल ओबडधोबड असला, अगर त्यास परदेशी मालापेक्षां किंमत थोडी अधिक पडूं लागली तरी घ्यावयाची, पण देशीच माल घ्यावयाचा, असा माधवरावांच्या विचारांचा रोख असावा असें दिसतें.

माधवरावांनीं उद्योगधंद्यांसंबंधीं केलेल्या चर्चेचा सारांश खालील-प्रमाणें देतां येईल.

"जात, गोत, पक्ष यांचा उद्योगधंद्याच्या संस्थेशीं संबंध आणतां उपयोगीं नाहीं. परिस्थितीच्या मानानें सोडवितां येईल असेंच ध्येय ज्या त्या वेळेला ठेवून वागण्याचें धोरण ठेवावें आपली परिस्थिति पूर्णपणें ओळखावी; कर्तव्याचा निश्चय व उद्योग अखंड कायम ठेवावा; परदेशांत ज्या औद्योगिक उलाढाली चालल्या असतील त्यांचा अभ्यास करावा; आणि त्यांपासून जो फायदा घेण्याजोगा असेल तो घ्यावा. परदेशांतील कुशल कारागिरांचा धिक्कार करूं नये; त्यांना येथें

आणून त्यांच्यापासून शिक्षण संपादन करावें; सरकारी मदतीवर अवलंबून राहूं नये; आपलें भांडवल वाढवावें; बँका, उद्योगधंद्याच्या शाळा स्थापन कराव्या........" वगैरे वगैरे.

बालवाचकांनो! या प्रकरणांतील सर्वच विचार जरी तुम्हांला समजले नाहींत, तरी तुम्ही शक्य तोंवर यांतील साध्या, मनाला पटणाऱ्या तेवढ्या, आपल्या देशाच्या व्यापाराच्या फायद्याच्या गोष्टी करण्याचा निश्चय केलात, तरी तुम्हांला किती तरी फायदा होत जाईल!

---

# प्रकरण १७ वें,

## राजकीय सुधारणेचें धोरण.

माधवराव मोठ्या सरकारी हुद्यावर असूनसुद्धां, त्यांच्या राजकीय चळवळीच्या आड सरकार येत नव्हतें, ही एकच गोष्ट त्यांच्या राजकीय चळवळीची योग्यता व रोंख कोणालाही दाखविण्यास पुरेशी आहे. रावसाहेबांचें राजकीय धोरण कोणत्या प्रकारचें असे, हें, सार्वजनिक 'सभेशीं' विशेष प्रमाणानें असलेला आपला संबंध तोडून त्यांनीं स्वतंत्रपणें डेक्कन सभा स्थापन केली, तेव्हा चांगल्याच प्रकारें दिसून आलें. वास्तविक पाहतां सार्वजानिक व डेक्कन सभांचा हेतु एकच आहे. परंतु सार्वजनिक सभेंतील सभासदांचें काम करण्याचे मार्ग आणि डेक्कन सभेंतील सभासदांचें काम करण्याचे मार्ग परस्परांपासून अगदींच भिन्न होते. त्यामुळें त्या दोन संस्था निरनिराळ्या होण्याचें कारण उपस्थित झालें. या मार्गांतच राजकीय चळवळींचें खरें रहस्य आहे असें माधवरावजींचें मत होतें. राजकीय चळवळी करूं नका असें कोणी म्हणणार नाहीं; कारण खुद्द न्यायमूर्ति रानडे यांनींच

राष्ट्रीय सभा स्थापण्याचें श्रेय घेतलें, व राष्ट्रीय सभेच्या उन्नतीसाठीं त्यांचे सतत प्रयत्न चाललेले होते; परंतु कामें करण्याच्या रीतींत फरक आहे. आपली परिस्थिति काय आहे, आपलीं साधनें काय आहेत, आपल्या अडचणी काय आहेत, याविषयीं पूर्ण माहिती मिळवून, देणारांची स्थिति पाहून, मागणें करणें व तें रास्त असूं देणें यांत राजकीय धोरण आहे, असें, माधवरावांनीं सार्वजनिक सभेमार्फत सरकारला केलेले अर्ज व ते इंदुप्रकाशाचे संपादक असतांना त्यांनीं लिहिलेले या विषयावरील लेख पाहिले असतां दिसून येणार आहे. परंतु या धोरणाचें अवलंबन करित असतां, सत्याचा त्याग त्यांनीं केलला नाहीं, अगर सत्य एका बाजूला ठेवून आपल्याच पक्षाला जोर आणण्याचा त्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं.

बाळांनो, हा विषय अत्यंत गहन आहे. त्याचें ज्ञान होणें अगर करून घेणें, हें ज्याच्या त्याच्या बुद्धिमत्तेवर सोंपाविणेंच श्रेयस्कर होईल असें वाटतें !

---

# प्रकरण १८ वें,

## माधवरावांचा उजवा हात !

पुरुषांची अब्रू बायकांच्या हातांत असते, हें तत्त्व लक्षांत ठेवल्यास माधवरावांच्या सहधर्मचारिणीनें जर परिस्थिति ओळखून मन थोर केलें नसतें, तर माधवरावांच्या आयुष्यांतील शांतता, आनंद व समाधान पार मावळून गेलें असतें. आणि त्यांच्या सुखावर अवलंबून असणाऱ्या सर्व आप्तांची व आश्रितांची वाईट दशा होऊन सर्वत्र बखेडा माजायला वेळ लागला नसता. माधवरावांचा द्वितीय

विवाह सन १८७३ सालांत श्रीमती रमाबाई यांचेबरोबर झाला. विवाहाचे वेळींच शास्त्राप्रमाणें माधवरावांचें व त्यांचें जीवित एकरूप झालें, व तें त्याप्रमाणें श्रीमती रमाबाईंनीं आपल्या पुढील आचरणानें खरें करून दाखविलें! यांतच त्यांची थोरवी दिसून येणार आहे.

श्रीमती रमाबाई लग्नांत अकरा वर्षांच्या होत्या. त्यांना शाळेंत जाऊन शिकणें अथवा लिहिणें, वाचणें हेंही ठाऊक नव्हतें, तरी त्यांची आई गृहकृत्यांत कुशल, परोपकारी व उदार मनाची होती, व तिचे गुण मुलींत उतरले होते. वडिलांनींही सासरीं धाडतांना केलेला उपदेश फार थोर प्रकारचा होता, व त्याचा ठसा रमाबाईंच्या मनावर कायम होता. त्याच्याच जोडीला माधवरावांसारखा जगद्वंद्य पति मिळाल्यामुळें सासुरवासाच्या अवघड परिस्थितींतून स्वतःस निभावून माधवरावांना व सर्व कुटुंबाला शांतता व सुख देण्याची अद्वितीय कामगिरी रमाबाईंनीं करून दाखविली. "चहाडीनें एक कुटुंबच काय पण मोठमोठालीं राज्येंदेखील रसातळाला जातात!" असा वडिलांचा शब्द रमाबाईंच्या डोळ्यांसमोर नित्य असे. नणंद, सासू वगैरे मंडळीचा जाच व कठोर बोलणें सोसूनही, कार्यकर्त्या माधवरावांना बाहेरून आल्यावर त्रास होऊं नये म्हणून, रमाबाई त्यांना त्यांतील एक अक्षर बोलत नसत; इतकेंच नव्हे, तर आपली मुद्रासुद्धां कधीं त्यांनीं त्रासिक अगर दुर्मुखलेली दाखवून दिली नाहीं. पतीची आज्ञा पालन करण्याकरितां कितीही त्रास पडला, वडीलधाऱ्या माणसांना नाखुष करण्याचा प्रसंग आला, तरी रमाबाईंनीं सर्व त्रास सोसला; पण आज्ञापालन केली. इतकेंच नव्हे तर शिक्षणाच्या बाबतींत नणंद, सासू वगैरे वडील माणसांनीं असली आज्ञा मोडली ना पाहिजे असेंही सांगितलें. तरी "पतिसेवा हेंच परंपरेनें स्त्रियांचें आद्य व प्रमुख

कर्तव्य आहे ! पतीनें विहिरींत उडी मारून जीव द्यावयास सांगितला, तरी पत्नीनें क्षणाचाही विलंब न लावतां पतीची आज्ञा खरी करून दाखवावी; इतकी पातिव्रत्याची कसोटी पत्नीनें पाळली पाहिजे ! " अशा दर्जाची विचारसरणी रमाबाईची होती, व यामुळेंच माधव-रावांना कोणत्याही परिस्थितींत घराचा सर्व भार रमाबाईवर टाकून देशाचें कल्याण करण्याची सुसंधि मिळत गेली. अशा आर्यस्त्रिया व धर्मपत्नी या आपल्या हिंदुस्थानांत अद्याप लाखांनीं मोजण्यासारख्या आहेत, म्हणून परमेश्वराचे आपण फार उपकारच मानले पाहिजेत !

---

# प्रकरण १९ वें,

## माधवरावांचें दुखणें व शेवट.

न्यायमूर्तींची प्रकृति मृत्यूपूर्वीं असावी तशी मुळींच नसे. त्यांच्या शक्तीपेक्षां फाजील काम, शरीराला, मनाला व बुद्धीला ताण देणारें, बरेच दिवस त्यांनीं केल्यामुळें त्याचा अनिष्ट परिणाम त्यांच्या आरोग्यावर हळूहळू होत होता. त्यांची एक बाजू बरीच दुखत असे व त्यांना कांहींतरी काळजाचा विकार झाला होता. मधून मधून कांहीं-वेळपर्यंत ते अगदीं बेशुद्ध पडत असत, व हें दुखणें कोणत्या वेळीं घात करील याचा नेम नाहीं असें डॉक्टरांनाही वाटत असे; परंतु त्यांचा अंत इतका समीप आला होता हें त्यांच्या स्वतःवांचून इतर कोणाच्या स्वप्नींही नव्हतें; एवढेंच नव्हे तर ज्या दिवशीं त्यांचा अंत झाला त्या दिवशीं रात्रीं दहा वाजेपर्यंत आंता थोड्या वेळानें त्यांची या जगांतील यात्रा संपणार असें त्यांच्या जवळच्या कोणच्याही माण-सास वाटलें नाहीं. माधवराव ता. १६।१।१९०१ रोजीं सायंकाळीं

७॥ वाजतां बाहेरून फिरून आले. नंतर रा. रा. भाजेकर वकील व शेट भगवानदास यांजपाशीं एका विशेष महत्त्वाच्या अशा गोष्टीसंबंधानें त्यांचें बोलणें झालें. त्यानंतर जेवणखाण झाल्यावर नेहमींप्रमाणें वाचन वगैरे सर्व झालें. जास्टिन मॅकॉर्थीच्या इतिहासाचें त्या वेळीं वाचन चालू होतें. याच वेळीं जयपूरचे दिवाणबहादूर कांतिचरण मुकरजी यांच्या आकस्मिक मृत्यूविषयीं त्यांनीं असे उद्गार काढले कीं:—

" That is the best death to die while working. "

ह्मणजे " आपलें कर्तव्य बजावीत असतां आलेला मृत्यु हा उत्तम मृत्यु होय ! " आणि हे उद्गार काढल्यानंतर अर्ध्या तासाच्या आंतच माधवरावजींचा इहलोकींचा वास संपला. निजायला म्हणून ते आपल्या नेहमींच्या ठिकाणीं गेले, तों त्यांच्या छातींत विलक्षण प्रकारच्या कळा येऊं लागल्या व यापेक्षां मृत्यु बरा असेंही ते ह्मणाले. डॉक्टरांना टेलीफोननें बोलाविलें, तों त्यांचा अंत झाला ! रात्रौ नऊच्या सुमाराला आपली प्रकृति रोजच्यापेक्षां आज बरी आहे, आज आपण येण्याची कांहीं आवश्यकता नाहीं, असा निरोप डॉक्टरला कळविला होता ! अशा रीतीनें न्यायमूर्तींचा अंत आकस्मिक रीतीनें झाला. व हिंदुस्थानचा ज्ञानदीप मावळला !

---

# प्रकरण २० वें.

## माधवरावांचा स्वभाव व त्यापासून बोध

### बाह्यस्वरूप.

माधवरावांच्या चेहऱ्याची ठेवण एकदम मनांत भरण्यासारखी नव्हती. एकंदर शरिराचा बांधा धिप्पाड, व डोकें फारच मोठें होतें.

त्यामुळें पाहणारा एकदम आश्चर्य केल्याशिवाय राहात नसे. शरीर धिप्पाड, चेहरा भव्य व त्याबरोबरच वर्ण गोरा होता. त्यानें तर त्यांना पाहतांच कोणाही मनुष्यावर तावडतोब परिणाम होत असे !

## एकडोळया.

माधवरावांचें वाचन व अभ्यास किती दांडगा होता व त्यांनीं त्या पायीं आपले डोळे कसे बिघडवून घेतले हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यामुळें माधवरावांचा एक डोळा गेलाच होता. व एकानेंच साधारण दिसत होतें; त्यामुळें त्यांना विनोदानें एकाक्ष अथवा एकडोळ्या असें त्यांचे मित्र म्हणत असत ! परंतु त्यांनीं एका डोळ्यानें जितकें वाचन, अभ्यास व कार्य केलें, तितकें दोन डोळे असणाऱ्या हजारों, लाखों लोकांनींही केलेलें नाहीं ही गोष्ट त्यांना किती भूषणावह आहे बरें !

## पोषाख

शरीराच्या सुंदरपणाचे खालोखाल माणसाच्या पोषाखाचा पाहणाराच्या मनावर बराबाईट परिणाम होत असतो. " एकनूर अदमी दसनूर कपडा " या म्हणीप्रमाणें पोषाखाचा भपका व नीटनेटकेपणा माणसाला वश करितो किंवा दूर लोटितो. माधवरावांचा पोषाख अगदीं साधा असे. त्यांत नवीन सुधारणेचा थाटमाट बिलकूल नव्हता. खरा फरक आपल्या मनाचा झाला पाहिजे, बाहेरच्या रूपांत फेरबदल करणें ही खरी सुधारणा नव्हे, असें माधवरावांचें मत होतें, आणि तेंच योग्य असें कोणाला वाटणार नाहीं ?

## संवयी.

माधवरावांच्या संवयी इतक्या साधेपणाच्या होत्या कीं, त्या एकाद्या संसार सोडून केवळ परमेश्वराची भक्ति करणाऱ्या साधु पुरु-

ष्याला शोभण्यासारख्याच होत्या. माधवरावांचे ठिकाणीं जितके गुण जास्त तितकाच त्यांचा विनयही फारच थोर होता.

## शांतपणा व परोपकार.

माधवरावांचा स्वभाव अतिशय शांत व गंभीर होता. मान व अपमान या क्षुल्लक गोष्टींकडे ते कधींच लक्ष देत नसत. त्यांच्या स्वभावाचा शांतपणा कधींच ढळत नसे. एकदां एका लांकडें विकणाऱ्या मोळीवालीनें त्यांच्या डोक्यांवरील पगडी पाडली ! पण ते रागावले नाहींत ! उलट पोलीस शिपायानें तिला अडविलें, पण स्वतः जाऊन तिची सुटका केली. दुसऱ्या एका प्रसंगीं एका मारेवाल्या बाईनें त्यांना ओझें उचलण्यास मदत करा म्हणून सांगितलें; माधवरावांनीं तिचें ओझें उचलून डोक्यावर दिलें ! परोपकाराच्या कामाची—मग तें कोणत्याही स्वरूपाचें असो—कोणतीही संधि माधवराव वायां घालवीत नसत. स्वतः शरीरानें व पैशानें जेवढी दुसऱ्यास मदत करणें शक्य असेल, तेवढी तावडतोब करीत असत.

## आत्मसंयमन व क्षमाशीलपणा.

माधवरावांनीं सर्व लोकांच्या हिताचीं कामें करण्यास आरंभ केला होताच. त्यामुळें त्यांच्यावर नानातऱ्हेचे, त्रासाचे व दुसऱ्याकडून निंदा करून घेण्याचे व शिव्या खाण्याचेसुद्धां प्रसंग येत; परंतु ते आपण हातीं घेतलेल्या कामाच्या मोठेपणाकडे पहात, आणि बाकीच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून, आपलें मन आपल्या ताब्यांत ठेवून, वागत असत. त्याचबरोबर दुसऱ्यानें किती जरी अपराध केले, निंदा केली अगर अपमान केला, तरी त्याच्यावर न रागावतां, क्षमाच करून वागावयाचें, असा माधवरावांचा निश्चय व बाणा होता.

## आत्मस्तुतीचा कंटाळा.

माधवरावांच्यापुढें कोणी त्यांच्या स्तुतीनें भरलेला लेख वाचूं लागला अथवा स्तुति करूं लागला, तर माधवराव त्याला थांबवीत व म्हणत कीं, "आमच्याविरुद्ध एखादी खरमरीत टीका असेल अथवा आमची निंदा करणारा एखादा लेख असेल तर वाचा; म्हणजे आमचे दोष आम्हांला कळतील. एकादा नवीन विचार कळेल, आमच्यांत सुधारणा करण्यास सांपडेल; वगैरे. आणि एवढ्याचकरितां विरुद्ध असलेले लेख व टीका माधवराव मुद्दाम वाचून घेऊन ऐकत असत. केवढी ही मनाची तयारी!

## घरची रहाणी.

माधवरावांचा पोषाखांत व इतर व्यवहारांत जसा साधेपणा होता, तसाच त्यांच्या घरच्या राहणींतही तो दिसून येत होता. एवढा मोठा पगारदार अधिकारी, पण त्याच्या घरांत टेबलें, खुर्च्या यांची ऐट मुळींच नव्हती! त्यांच्या बसावयाच्या जागेंत एक झोपाळा टांगलेला असे, त्याच्यावर माधवराव नेहमीं बसलेले असत. त्यांची भेट घेण्यास कोणास मज्जाव नसे. माधवरावांचा साधेपणा इतका होता कीं, कधीं कधीं घरांत ते एका चटईवर मांडी घालून व मांडीवर कागद घेऊन साध्या बोरूच्या लेखणीनें इंग्रजी लिहीत असत. आणि आतां आठ वर्षांच्या शाळेंतल्या मुलाला टाकाशिवाय आणि टेबलखुर्चीशिवाय एक क्षणभर चालत नाहीं!

## विनोद, थट्टामस्करी.

माधवरावांचा चेहरा शांत गंभीर असे. त्यामुळें पुष्कळांना माधवरावांना थट्टामस्करी, हासणें म्हाहितच नसावें असें वाटण्याचा संभव होता. परंतु माधवरावांच्या बरोबरीचे व समानशील असे मित्र आले

म्हणजे एकमेकांशीं संवाद चालतांना, परस्परांच्या थट्टेनें माधवराव मनमुराद हासत असत. परंतु असे प्रसंग थोडे येत, हें मात्र खरें ! त्याचें कारण माधवरावांचें चित्त सर्व काळ कोणत्याना कोणत्या तरी लोकांच्या उपयोगीं कामांत तल्लीन झालेलें असल्यानें थट्टामस्करीचे हलके विषय बोलण्यास त्यांना सवडच होत नसे.

## संभाषणाची पद्धति.

माधवरावांचें भाषण गोड असे; शिवाय त्यांचें वाचन व ज्ञान अगाध असल्यानें त्यांच्याशीं संभाषण करणाऱ्याला कोणत्याही विषयाची पूर्ण माहिती होऊन जात असे. त्यांच्या संभाषणांत, टाकाऊ किंवा निपरुयोगी विचार येत नसत. माधवराव कोणाही व्यक्तीच्या नांवाचा संबंध आणीत नसत; व कदाचित् आलाच तर तिची निंदा, कुचेष्टा किंवा तिच्या दोषाबद्दल अनादर चुकून देखील त्यांच्या तोंडून बाहेर पडत नसे व दुसऱ्यानें तसें केलेलेंही त्यांना आवडत नसे.

## मनाची एकाग्रता.

माधवरावांच्या मागें नाना प्रकारचीं कामें नेहमीं असत. तथापि त्यांच्या मनाची एकाग्रता अवर्णनीय होती. भोंवतालीं मुलांचा गलबला चालला आहे, नोकरचाकर इकडून तिकडे येरझारा घालीत आहेत, शेजारीं माणसें बोलत आहेत; अशा परिस्थितींत त्यांना एकाग्र चित्तानें वाचन किंवा लेखन करण्याला अडचण वाटत नसे. गोंगाटामुळें त्यांना त्रास होत नव्हता असें नाहीं; परंतु त्यांनीं आपलें मन इतकें जिंकून ताब्यांत ठेविलें होतें कीं, एकादवेळ जरी मनाची एकाग्रता गेली तरी पुन्हां ताबडतोब ते आपल्या कामांत गुंग होऊन जात असत !

## कामाचा कंटाळा.

आपणास कामें फार, त्यामुळें वेळ मिळत नाहीं, अगर कंटाळा येतो, अशी तक्रार माधवरावांच्या तोंडून कोणींही कधीं ऐकली नाहीं! नेहमीं दुसऱ्या माणसांनीं आपल्याकडे यावें, नव्या नव्या कामांची चर्चा व्हावी, अशी त्यांना मनापासून इच्छा असे व रिकाम्या गप्पागोष्टी करायला कोणी त्यांच्याकडे गेल्यास त्याला एकाद्या कामास जुंपून गोड शब्दांनीं त्याला घालवून देण्यांत माधवराव फार कुशल होते!

## मनावर ताबा

माधवरावांनीं आपलें मन आपल्या ताब्यांत ठेवण्याचा फार श्रमानें अभ्यास केला होता. त्यांच्या साठ वर्षांच्या आयुष्यक्रमामध्यें, त्यांच्या तोंडांतून राग, द्वेष, मत्सर, अगर अहंपणा इत्यादि वाईट विकारांच्यामुळें अगर कोणत्याही कारणानें, वाईट शब्द, किंवा दुसऱ्यास शिवीगाळ, अशी कधींच बाहेर पडली नाहीं! यामुळें त्यांना अजीबात रागच येत नव्हता, अगर त्यांचे ठिकाणीं तापटपणा नव्हता असें नव्हे. तर त्यांनीं प्रयत्नानें तशी वेळ येऊं दिली नाहीं. कॉलेजांत असतांना माधवरावांना जर कधीं अतिशय राग आला व त्यांचें भान जाण्याची वेळ आली, तर ते दाराला कडी लावून आपल्या खोलीमध्यें एकटेच तासचे तास घालवीत! त्याचें कारण इतकेंच कीं, रागाच्या सपाट्यांत एकादा अपशब्द उच्चारला जाण्याचा संभव असतो तसा प्रसंग येऊं नये!

## मीपणा

माधवरावांच्या ठिकाणीं मीपणा अजीबात नव्हता हें त्यांच्या स्वभावाचें भूषण होतें. ते इतके थोर होते, तरी मंडळींत बसले म्हणजे कोणालाही हे आपणांतलेच खेळीमेळीचे आहेत असें वाटत असे,

इतकी त्यांची वागणूक निगर्वी असे. मीं अमुक केलें, मीं तमुक केलें, असें त्यांच्या तोंडून कधींही निघत नसे. तथापि दुसऱ्यानें मात्र कितीही बारिक सारीक कामगिरी केली असली, तरी तिची माधवराव चांगली स्तुति करून दुसऱ्यास चांगलें स्फुरण उत्पन्न करीत असत.

## माधवरावांची हिंमत.

माधवरावांना निराशा ही कधीं माहीतच नव्हती. त्यांची दृष्टि दूर-वर असे. त्यांची उद्योगावर पूर्ण निष्ठा होती, त्यामुळें कसलेंही संकट आलें तरी ते कधींही भीत नसत अगर निराश होत नसत. त्यांची नेहमींची आवडीची भाषा म्हणजे " अडचणींशीं लढाई दिल्याशिवाय कार्यभाग झाल्यास त्यांत पुरुषार्थ कसला ! अडचणींच्या डोक्यांवर पाय देऊन जर आपलें ध्येय, कष्टाच्या जंजाळांत, दम न सोडतां, सिद्धीस नेलें, तरच आपली खरी शहामत व करामत !"

## प्रखर नीतिमत्ता

माधवरावांची नीतिमत्ता अतिशय पवित्र व कडक होती. तिच्या-पुढें त्यांच्यापेक्षां वडील-धाऱ्या माणसांनासुद्धां नमतें घ्यावें लागत असे; इतकी त्यांची सर्वांवर छाप होती ! कै० ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं असें म्हटलें आहे कीं, माधवरावांच्या सहवासांत मनांतील पाप-विचार जळून जात असत, आणि शुभ, पवित्र व आत्मोन्नतिपर असेच विचार सर्वांच्या मनांमध्यें वाढून त्यांच्या मनाची सुधारणा होत जात असे.

## वक्तृत्व ( बोलण्याची शैली ).

माधवरावांचे विचार थोर असत. माहिती भरपूर असे, सांगणें कळकळीचें असे. भाषणांत गोडी व रसिकपणा होता. ते भाषणानें खात्री पटविण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या भाषणानें लोकांचीं मनें

आकर्षिलीं जात, आणि वश होत असत. त्यांच्याबद्दल श्रोत्यांचा पूज्यभाव व आदर असे. माधवरावांचें भाषण ऐकणारांना आवडे. त्यांचा आवाज मोठा घंटेसारखा घणघणणारा होता.

## माधवरावांची लेखनकला.

माधवरावांचें सर्व लेखन गंभीर, विचारपूर्ण व चिरकालीन टिकणाऱ्या स्वरूपाचें होतें. त्यांनीं कांहीं मोठे ग्रंथ व कांहीं सुटे निबंध लिहिले आहेत. विशेषतः मराठ्यांचा इतिहास, अर्थशास्त्र व धर्म यांवरील ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा शोख फार असे.

## वरिष्ठांची मर्जी.

माधवरावांना आपल्या वरिष्ठाकडे विनाकारण जाणें, त्याची स्तुति करणें, अगर बढतीच्या दृष्टीनें त्याची हांजीहांजी करण्याचा यत्न करणें कधींच आवडत नसे. आपलें कर्तव्य उत्तम तऱ्हेनें करावयाचें, मग त्यामुळें वरिष्ठाची गैरमर्जी झाली अगर गैरसमज झाला, तरी त्याची माधवरावांनीं कधीं पर्वा केली नाहीं !

## व्यसन.

माधवरावांना कसलेंच व्यसन नव्हतें. त्यांचें व्यसनच सांगावयाचें झाल्यास ज्ञान मिळविणें आणि लोकांचें हित करणें, एवढेंच म्हणतां येईल. माधवरावांना मैदानी अगर मर्दानी खेळांचा नाद नव्हता; फक्त रोज सकाळ–संध्याकाळ फुरसत असेल त्या मानानें चार सहा मैल स्वच्छ हवेंत हिंडायला जाण्याचा माधवरावांचा नित्य नियम होता.

## करमणूक.

ज्ञान मिळविणें याशिवाय माधवरावांना करमणूक माहीत नव्हती, असें म्हटलें तरी चालेल. /एका विषयाचा कंटाळा आला म्हणजे दुसऱ्या विषयाचीं पुस्तकें वाचावयाचीं, त्यांत लक्ष लागेना तर तिसऱ्या

विषयाकडे वळावयाचें, अशा प्रकारें ज्ञानाच्या पुस्तकांमध्येंच त्यांची सर्व करमणूक चाले. याशिवाय बाहेरची करमणूक म्हणजे एक सोंगट्या अगर बुद्धिबळें, हाच त्यांचा करमणुकीचा खेळ असे.

## घरांतील वर्तन.

माधवरावांच्या घरीं नातेवाईक, आश्रित व नोकरचाकर यांची नेहमीं गर्दी असे. सर्वच मंडळीशीं ते अतिशय जिव्हाळ्यानें व प्रेमानें वागत असत. आश्रितांबरोबरही ते नातेवाईकांप्रमाणेंच वागत असत. आपल्या मनाविरुद्ध गोष्ट करावी लागली अगर कोणीं केली, तरी तिला मोडता घालून आपल्या अगर परक्या माणसांचा त्यांनीं कधीं विरस केला नाहीं. आपल्या कुटुंबांत सर्वांचें स्वास्थ्य रहावें, कोणीही कोणाशीं भांडूं नये आणि असे प्रसंगही येऊं नयेत, अशी त्यांची फार दक्षता असे. या कामीं त्यांना त्यांच्या थोर मनाच्या पत्नी श्रीमती रमाबाई यांचा फार उपयोग होत असे.

बालवाचकांनो ! याप्रमाणें माधवरावांच्या स्वभावाचें चित्र तुमच्यापुढें ठेविलें आहे, त्याचा नीट विचार करा व आपलेंही शील, स्वभाव श्रेष्ठ प्रतीचा करण्याचा यत्न करा ! म्हणजे तुम्हांलाही माधवरावांसारखें थोर पुरुष होतां येईल, व तुमच्या जीविताचें सार्थक होईल !

# प्रकरण २१ वें.

## उपसंहार.

बालवाचकांनो, माधवरावांसारखीं माणसें कोणत्याही देशांत पाहिलीं, तरी वारंवार लाभत नसतात. इंग्लंडांत आजपर्यंत एकच ग्लॅडस्टन या नांवाचा थोर महात्मा होऊन गेला! तसेच माधवराव हे या देशांतील हिंदुस्थानचे ग्लॅडस्टन होते असें म्हटलें असतां शोभेल! इतकी माधवरावांची योग्यता होती. चांगलें शरीरसामर्थ्य, विशाल बुद्धि, खरी लोकहिताची इच्छा, द्रव्याचें चांगलें पाठबळ, उद्योग करण्याची विशेष आवड वगैरे व दैवयोग इतकीं साधनें एकत्र जमलीं असतां एकाच व्यक्तीचे हातून केवढें मोठें कार्य होऊं शकतें, याचें माधवराव हे एक उदाहरणच होते यांत शंका नाहीं.


माधवरावांची बुद्धि जशी विशाल, तसेंच त्यांचें ज्ञानही अपार होतें. त्यांचा हुद्दा, अधिकार जितका मोठा, तितकाच त्यांच्या वागणुकींत साधेपणा होता. त्यांच्या वृत्तींत गर्व तर नव्हताच! आपलें कर्तव्य करण्याला त्यांनीं कधींही कसूर केली नाहीं. त्यांनीं सार्वजनिक हिताच्या कामीं स्वतःला इतकें वाहून घेतलें होतें कीं, आपल्या लोकांचें खरें हित तें आपलें हित, असे त्यांचे रात्रंदिवस विचार व धोरण असे. अशा प्रकारें लोकांचें कल्याण करण्याकरितां व लोकांचें संकट टाळण्याकरितां माधवरावांचे नेहमीं प्रयत्न चाललेले असत. माधवराव स्वतःच्या गरजांविषयीं इतके बेपर्वा असत कीं, सगळ्या देशाच्या हितासाठीं रात्रंदिवस जपणारे माधवराव यांच्या स्वतःच्या गरजा काय असाव्यात, याविषयीं घरांतील माणसांना पहावें लागत असे!

शेवटीं माधवराव जे इतके सर्वांना वंद्य व आदरणीय झाले, त्याचें

खरें वर्म त्यांच्या स्वभावांत आहे, त्यांच्या ठिकाणच्या दैवी गुणांत आहे. ते नेहमीं असे वागत कीं, या जगांत आपणाला एकही शत्रु असतां उपयोगी नाहीं. इतकें आचरण शुद्ध व निर्मल राहावें ! इतकेंच नव्हे, तर शत्रुभावनेचा मनुष्य आला तरी तो मित्राच होऊन गेला पाहिजे, इतकें आपल्या शुद्धाचरणाचें तेज पाहिजे, असें त्यांचें मत असे ! त्यांच्याविषयीं देशांतील प्रत्येक माणसाला माधवराव आपले हितचिंतक, आपले कल्याण करणारे, आपले मित्र, आपले साहाय्यक, आपले सल्लागार, असेंच वाटत असे; आणि याकरितां त्यांचें नित्य दर्शन घडावें, त्यांचा सहवास घडावा, त्यांचें आपणांस अनुकरण करण्यास मिळावें, त्यांचा गौरव करण्यास मिळावा, असें सर्वांस वाटत असे. हाच त्यांच्या स्वभावाचा विशेष होय ! आणि बालमित्रांनो, सर्व जगाबरोबर तोच तुम्हीही आपल्या स्वभावांत आणण्याचा प्रयत्न करावा आणि माधवरावांचें सर्व बाबतींत शक्य तोंवर अनुकरण करून तुम्हीं थोर व्हावें, जगाला वंद्य व्हावें, आपल्या जन्माचें व त्याबरोबरच तुमच्या मित्रांचेंही सार्थक करावें, याच गोड हेतूनें हें उदार चरित्र तुमच्यापुढें ठेविलें आहे. त्याचा तुम्ही उपयोग करून घ्यावा व लेखकास ऋणी करावें, याशिवाय लेखकाची दुसरी सदिच्छा काय असणार, बरें !

इति शुभम् ॥

समाप्त



## बालवाङ्मयामध्यें
## क्रांति घडवून आणणारीं व

बालहितचिंतन मालेमार्फत प्रसिद्ध होण्याकरितां
अगदीं नवीन धर्तीवर लिहिलेलीं पुस्तकें

( एस्. एम्. शेख-कृत )

१ खलीफा हजरत उस्मानगनीचें चारित्र !
२ ” ” मौला अलीचें चरित्र !
३ भारतीय नेपोलियन ऊर्फ “ खान जहान लोदी ”
४ महासाध्वी फातिमा बिबी !

---

१ बालसाधु कबीर ! ( आर. डी. गुरव व
एस्. एम्. सिन्नरकर वकील–कृत )
२ मुलांचे दादाभाई ! ( दादाभाई नौरोजींचें चरित्र )
३ बाणेदार विद्यार्थी ! ( आगरकरांचें चरित्र )
४ बालसन्मित्र ! ( चिपळूणकरशास्त्री )
५ जैनधर्मीय विभूतिरत्नें अर्थात् तीर्थंकरांचा प्रसाद,
भाग १।२।३

हीं पुस्तकें लवकरच प्रसिद्ध होणार!

REFBK-0004116